पाक्षिक
प्रदेश बीजेपी

# मनोगत

मुंबई I वर्ष: 6 I अंक: 14 I 16 जुलै, 2024 I पृष्ठसंख्या: 36 I किंमत: 5 रू.




# एकच निर्धार
# महायुती सरकार



## अध्यक्षीय मनोगत

# एकजुटीने लढायचे आहे...

भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यासह महायुतीतील घटक पक्षांचा संयुक्त मेळावा नुकताच मुंबईत झाला. लोकसभा निवडणुकीत महायुतीची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नाही. या पार्श्वभूमीवर हा संयुक्त मेळावा झाला. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने केंद्रातील मोदी सरकार आणि भारतीय जनता पार्टी विरोधात अनेक खोट्या-नाट्या गोष्टी पसरवण्यात आल्या. या खोट्या प्रचाराला आपण वेळीच योग्य उत्तर देऊ शकलो नाही. त्यामुळेच महायुतीला अपेक्षित यश मिळू शकले नाही. विधानसभा निवडणुकीत महायुतीने महाविकास आघाडीच्या अपप्रचाराला वेळीच योग्य उत्तर देण्याचे ठरविले आहे. महाविकास आघाडीला लोकसभा निवडणुकीत महायुतीपेक्षा फक्त दोन लाख मते अधिक मिळाली. महायुती आणि महाविकास आघाडीला मिळालेली मते, मिळालेल्या जागा याचे प्रमाण खूपच व्यस्त आहे. संविधान बदलले जाणार यासारखा अपप्रचार, अनेक मतदारसंघात अल्पसंख्यांक वर्गाने एकजुटीने केलेले मतदान, यामुळे महाविकास आघाडीला महायुतीपेक्षा अधिक जागा मिळाल्या आहेत. महायुतीच्या संयुक्त मेळाव्यात आपले नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकसभा निवडणुकीतील मतांचे गणित व्यवस्थित समजावून सांगितले. लोकसभा निवडणुकीच्या निकालामुळे महायुतीतील अनेकांचे मनोधैर्य खचले होते. देवेंद्रजींनी आपल्या भाषणातून कार्यकर्त्यांचे मनोधैर्य उंचावले. विधानसभा निवडणुकीत महायुतीलाच बहुमत मिळणार, यात शंका नाही. खोट्या प्रचाराचा परिणाम दीर्घकाळ टिकत नसतो. विधानसभा निवडणुकीला दोन-तीन महिन्याचा कालावधी बाकी आहे. या कालावधीत महायुतीच्या कार्यकर्त्यांनी महाविकास आघाडीच्या डावपेचांना कसे उत्तर द्यावे, याबाबतचे मार्गदर्शन देवेंद्रजींनी या मेळाव्यात सविस्तरपणे केले. महाविकास आघाडीच्या नेत्यांचा भर यापुढील काळातही खोट्या प्रचारावर राहणार आहे. त्याला तोंड देण्यासाठी महायुतीतील घटक पक्षांच्या नेत्यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांबद्दल वारंवार सांगितले पाहिजे, असा कानमंत्र देवेंद्रजींनी या मेळाव्यात दिला. महायुती सरकारच्या अर्थसंकल्पात सर्वसामान्य माणसांसाठी अनेक योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, वर्षाला तीन गॅस सिलेंडर देणारी अन्नपूर्णा योजना, शेतकऱ्यांना मोफत आणि हमखास वीजपुरवठा करण्यासाठीची सौरपंप योजना अशा अनेक योजना राज्य सरकारच्या अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आल्या आहेत. या योजना मतदारांपर्यंत सातत्याने नेल्यास महायुती सरकारच्या लोककल्याणकारी कारभाराची माहिती मतदारांना होईल. महाविकास आघाडीचे नेते सकाळपासून रात्रीपर्यंत आपल्याविरुद्ध अपप्रचार करीत असतात. त्याला तोंड देण्यासाठी महायुतीतील सर्व नेत्यांनी संधी मिळेल तेव्हा केंद्र आणि राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांची माहिती जाहीरपणे सांगितली पाहिजे. महाविकास आघाडीचे डावपेच या पद्धतीने निकामी करता येतील, हे ही देवेंद्रजींनी सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही महायुतीतील समन्वय वाढवण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न सुरू केले आहेत. आपल्या नेत्यांच्या प्रयत्नांना कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे साथ दिली पाहिजे.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग







०४ एकच निर्धार, महायुतीचे सरकार

१३ महिला हिताय, शेतकरी सुखाय

२० पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना रशियाचा सर्वोच्च पुरस्कार’







२३ पंतप्रधान आवास योजनेची 9 वर्षे

२६ ‘असत्यचंद्राची’ फॅक्टरी

३२ शहरी नक्षलवादा विरोधातील कायदा






संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना
विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

**संपादकीय सल्लागार**

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

**विभागीय समन्वयक**

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २५ येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२-२२०२२०५०

# एकच निर्धार
# महायुतीचे सरकार




● **देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

> भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस तसेच महायुतीतील सर्व घटक पक्षांच्या संयुक्त मेळाव्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले मार्गदर्शन.

**सर्व** प्रथम मी जनसंघाचे संस्थापक डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांना स्मृतिदिनानिमित्त आदरांजली अर्पण करतो. देश स्वतंत्र झाल्यानंतर जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देण्यात आला होता. या विशेष दर्जामुळे जम्मू-काश्मीरमध्ये प्रवेश करण्यासाठी उर्वरित भारतातील नागरिकांना परवाना (परमीट) काढावा लागत असे. जम्मू-काश्मीर हा भारताचा भाग असल्यामुळे तेथे जाण्यासाठी परवान्याची गरज नाही, परवान्याची अट रद्द करावी व काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० वे कलम रद्द करावे, अशी मागणी डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी सर्वप्रथम केली होती. या मागणीसाठी आंदोलन केल्यामुळे डॉ.मुखर्जी यांना तुरुंगात टाकले गेले. ६ जुलै रोजी डॉ.मुखर्जी यांचा तुरुंगातच मृत्यू झाला. डॉ.मुखर्जी यांच्या स्मृतीला मी अभिवादन करतो. या मेळाव्यासाठी आलेल्या महायुतीच्या नेत्यांचे, पदाधिकाऱ्यांचे आणि कार्यकर्त्यांचे मी स्वागत करतो. लोकसभेच्या निवडणुका नुकत्याच झाल्या. या निवडणुकीत महायुतीला अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही. काही वेळेला राजकारणाला क्रिकेटमधील डकवर्थ-ल्युईसचा नियम लागू होतो. डकवर्थ-ल्युईस नियमामुळे क्रिकेट सामन्याचा निकाल भलताच लागतो. चांगली कामगिरी करणाऱ्या संघाला या नियमामुळे विजयापासून दूर राहावे लागते. तशीच परिस्थिती यावेळच्या लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाराष्ट्रात तयार झाली. महाविकास आघाडीचे नेते लोकसभा निवडणुकीत प्रचंड विजय मिळाल्याचा दावा करत आहेत. वस्तुस्थिती मात्र तशी







नाही. महाविकास आघाडीला महायुतीपेक्षा फक्त २ लाख मते अधिक आहेत. महाविकास आघाडीला २ कोटी ५० लाख तर महायुतीला २ कोटी ४८ लाख मते मिळाली आहेत. मात्र या २ लाख मतांमुळे महाविकास आघाडीच्या जागा ३० पर्यंत गेल्या. आता आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी निर्धार केला तर आपण महाविकास आघाडीपेक्षा २५ लाख अधिक मते मिळवून २०० पेक्षा अधिक जागा जिंकू शकतो. २० लाख अधिक मिळाली तरी महायुती विधानसभा निवडणुकीत बहुमत मिळवू शकते. तांत्रिक दृष्ट्या महाविकास आघाडीला लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात अधिक जागा मिळाल्या असल्या तरी महायुती पूर्ण ताकदीने

## ज्यांना बोलायची खुमखुमी आहे त्यांनी नेत्यांना विचारून बोलावे

**महायुतीच्या घटक पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी, प्रवक्त्यांनी बोलताना संयम बाळगला पाहिजे. आपल्यातली अनेक प्रवक्ते मंडळी एकमेकांवरच टीका करताना काहीवेळा दिसून येतात. यातून महायुतीमध्ये मतभेद आहेत, असे चित्र जनतेपुढे जाते. आपल्यापैकी काहीजणांना बोलण्याची प्रचंड खुमखुमी आहे, हे मला माहित आहे. अशी खुमखुमी असलेल्या मंडळींनी पत्रकारांशी बोलताना आपल्या ज्येष्ठ नेत्यांनी परवानगी घेऊनच बोलावे. विधानसभा निवडणुकीत आपल्याला एकदिलाने उतरायचे आहे. त्यासाठी जाहीर वक्तव्ये करताना सर्वांनीच परिस्थितीचे भान ठेवले पाहिजे.**

मैदानात उतरली आहे. यावेळच्या लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी सातत्याने खोटे आरोप केल्यामुळे आपल्याला लोकसभा निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे कामगिरी करता आली नाही, हे सत्य आहे. लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी केलेला खोटा-नाटा प्रचार महायुतीच्या पिछाडीस कारणीभूत ठरला असला तरी आपण सर्वजण गाफील राहिल्यामुळेही महायुतीला अपेक्षित यश मिळू शकले नाही, ही वस्तूस्थिती आहे. आपले विरोधक पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पार्टी यांच्या विरोधात रोजच खोटे बोलत असतात, त्यामुळे त्याचा मतदारांवर परिणाम होईल, असे आपल्याला वाटले नाही. रोज खोटे बोलल्याने मतदारांच्या मनावर परिणाम होतो, हे आता आपल्या लक्षात आले आहे. लोकसभा निवडणुकीत आपली लढाई महाविकास आघाडीतील काँग्रेस-राष्ट्रवादी आणि उबाठा या तीन पक्षांशी नव्हती तर आपल्या विरोधातील फेक नरेटिव्ह नामक चौथ्या पक्षाशी होती. रोज खोट बोल पण रेटून बोल या पद्धतीमुळे महायुतीच्या कामगिरीवर परिणाम झाला हे मान्य करावे लागेल, पण एक गोष्ट लक्षात ठेवा सत्य हे चिरंतन टिकणारे असते. असत्याचे, खोट्याचे आयुष्य छोटे असते. असत्य, खोट्या गोष्टी फार काळ टिकत नाहीत. असत्याच्या आधारावर एक निवडणूक जिंकता येते वारंवार निवडणुका जिंकता येत नाहीत, हे सर्व कार्यकर्त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. त्यामुळे विधानसभा




निवडणुकीत आपल्या विरोधकांचा खोटेपणा चालणार नाही. अर्थात एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, आपल्या विरोधकांना सतत खोटे बोलण्याची चटक लागली आहे. ही मंडळी आपल्या घरात तरी खरे बोलत असतील की नाही, याची शंका आहे. खोटे बोलण्याची चटक लागल्यामुळे विधानसभा निवडणुकीतही विरोधक मंडळी नवीन विषयावर खोटे बोलतील. मात्र तस झाल तर ज्यांना आपल्याला जशासतसे उत्तर द्यायचे आहे. आपल्याला गाफील राहून चालणार नाही. अजितदादांनी सांगितल्याप्रमाणे सरकारच्या योजना आपण सकारात्मक पद्धतीने मतदारांपर्यंत घेऊन गेलो तर आपल्याला कोणीच पराभूत करू शकणार नाही. त्यासाठी आपण सर्वांनी एकमुखाने सरकारच्या कामगिरीचा, चांगल्या योजनांचा प्रसार आणि प्रचार केला पाहिजे. विरोधकांची कार्यपद्धती तुम्ही नीट पहा, ते सर्वजण मिळून एकाचवेळी खोटे बोलत राहतात. दिवसाच्या सुरुवातीलाच आपले विरोधक आपल्या सरकारच्या 'लाडकी बहीण'सारख्या योजनावर काहीबाही बोलत राहतात. मग दिवसभर पत्रकार आणि प्रसारमाध्यमे त्याच विषयाची चर्चा करत राहतात. आपणही त्याला उत्तर देत राहतो. आता विरोधकांच्या या सापळ्यात आपण अडकायचे नाही. आपल्या सरकारची चांगली कामे आपण सर्वांनी रोज सांगितली पाहिजेत, सातत्याने सांगितली पाहिजेत. दिवसभरात वेगवेगळ्या पातळीवरून आपण आपल्या चांगल्या कामांबद्दल बोलत राहिलो तर त्याचा मतदारांवर निश्चितच सकारात्मक परिणाम होईल. जनतेची स्मरणशक्ती अल्पजीवी असल्यामुळे आपल्या सरकारची चांगली कामे एकदा सांगून भागणार नाही. अनेकवेळा

## महायुतीतील सर्व पक्षांच्या नेत्यांनी विकास योजनांवर एकमुखाने बोलावे

**महाविकास आघाडीचे नेते मोदी सरकार आणि राज्य सरकारविरुद्ध खोटं-नाटं बोलत असताना एकमुखाने सातत्याने बोलत असतात. दिल्लीपासून गल्लीपर्यंत आपल्या विरुद्ध महाविकास आघाडीचे नेते खोटा प्रचार करत असतात. या प्रचाराला आपण योग्यवेळी उत्तर देणार आहोतच. पण आपल्या सरकारच्या योजना महायुतीतील घटक पक्षांच्या सर्व नेत्यांनी एकमुखाने आणि सातत्याने सांगितल्या पाहिजेत. आपण आपल्या चांगला योजनांचा प्रसार करण्यात कमी पडतो, असे लोकसभा निवडणुकीवेळी दिसले आहे. विधानसभा निवडणुकीत आपण केंद्र आणि राज्य सरकारच्या चांगल्या योजना मतदारांना समजावून सांगायला हव्यात.**

चांगल्या योजनांची माहिती सांगितली गेली तर मतदार आपल्या चांगल्या कामांची नोंद घेतील. लोकसभा निवडणुकीत केंद्र आणि राज्य सरकारच्या चांगल्या निर्णयांबद्दल प्रचारात फारसं बोललं गेलचं नाही. आमच्या सर्वांचीच ही चूक आहे. उदाहरण द्यायचं झाल तर सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना भावांतर योजनेच्या माध्यमातून मदत करण्याचा निर्णय आम्ही घेतला होता. भावांतर योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट मदत देण्याचा निर्णय आपल्या सरकारने घेतला होता. मात्र लोकसभा निवडणुकीच्या संपूर्ण प्रचारामध्ये या निर्णयाबद्दल सांगितल गेलच नाही. चांगले निर्णय घेऊन







उपयोग नसतो हे चांगले निर्णय तितक्याच चांगल्या पद्धतीने जनतेपर्यंत पोहचवले गेले पाहिजेत. भावांतर योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मदत करण्याचा निर्णय आम्ही ज्या दिवशी घेतला त्याच दिवशी लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली. त्यामुळे त्या निर्णयाची अंमलबजावणी करता आली नाही. आता सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना झालेले नुकसान थेट बँक खात्यात दिले जाणार आहे. आपले विरोधक खूप तयारीचे आहेत. आपल्या सरकारच्या माझी लाडकी बहीण योजनेला ते विरोध करत आहेत. एकीकडे निवडणुका डोळ्यापुढे ठेऊन ही योजना आणल्याचा आरोप विरोधक करत आहेत. तर दुसरीकडे या योजनेचे फॉर्म घरोघरी वाटण्याचे काम आपले विरोधक करत आहेत. या योजनेसाठी पैसे कुठून आणणार, यासारखे प्रश्न विचारायचे आणि त्याचवेळी या योजनेचे फॉर्म घरोघरी वाटायचे, यातूनच या लोकांची हुशारी कळून येते. आम्हीच ही योजना सुरू केली आहे, अशा अविर्भावात आपले विरोधक वावरत आहेत. या बेगडी भावांपासून सावध रहा, असा संदेश आपल्याला मतदारांपर्यंत योग्य पद्धतीने पोहचवावा लागणार आहे. तुमचे खरे भाऊ महायुतीच्या व्यासपीठावर बसले आहेत, हे जनतेला आपण सर्वांनी सातत्याने सांगितले पाहिजे. ही नवी योजना आहे. जास्तीत जास्त महिलांना या योजनेचा लाभ मिळावा, यासाठी आपण या योजनेसाठी सुरुवातीला घातलेल्या सर्व अटी आता काढून टाकल्या आहेत. प्रसारमाध्यमांनीही या योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणत्याही अटी नाहीत, ही गोष्ट लक्षात ठेवावी. रहिवाशी दाखल्याबाबतची अट अनेक महिलांना त्रासदायक ठरते आहे, असे लक्षात आल्यामुळे १५ वर्षांपूर्वी मतदार यादीतील नाव, रेशनकार्डमधील नाव,

### नदीजोड प्रकल्पामुळे दुष्काळापासून मुक्ती मिळणार

**शेतकऱ्यांसाठी विविध सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारने निधी दिला आहे. राज्य सरकारनेही सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्राधान्याने तरतूद केली आहे. ज्याखेरीज राज्यात वेगवेगळे नदीजोड प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आपले सरकार प्रयत्न करत आहेत. नार-पार-औरंगा-अंबिका-दमणगंगा-वैतरना-उल्हास या नद्यांच्या उपखोऱ्यातील पाणी गोदावरी खोऱ्यातील तूट भरून काढण्यासाठी वापरण्यात येणार आहे. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रातील दुष्काळी भागाला या योजनेतून पाणी मिळणार आहे.**

पतीचा रहिवासी दाखला, वडिलांचा रहिवासी दाखला, अशा कोणत्याही कागदपत्रांच्या आधारे विवाहित महिलेला किंवा अविवाहित महिलेला या योजनेचा लाभ दिला जाणार आहे. उत्पन्नाचा दाखला मिळवण्यासाठी महिलांना रांगेत उभे राहण्याची आवश्यकता नाही. कारण ज्यांच्याकडे पिवळे आणि केसरी रेशनकार्ड आहे अशा सर्व महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्याचा निर्णय आपल्या सरकारने घेतला. ज्या महिलांकडे रेशनकार्डही नाही, अशा महिलांनी स्वतःच्या उत्पन्नाबाबत शपथपत्र दिल्यास तेही ग्राह्य मानले जाणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीबाबत महायुतीच्या कार्यकर्त्यांना कोणतीही अडचण जाणवली तर आमच्या लक्षात आणून द्या. या योजनेसाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने अर्ज स्वीकारले जात आहेत. ॲपद्वारेही या योजनेचा अर्ज स्वीकारले जात




आहेत. या योजनेचा लाभ मिळण्यापासून एकही महिला वंचित राहू नये, अशा पद्धतीने आपले सरकार काळजी घेत आहेत. तुम्हा सर्वांना माझी एक विनंती आहे की, या योजनेचा फॉर्म भरताना संबंधित महिलेचा बँक खाते क्रमांक अचूक पद्धतीने लिहला गेला आहे ना, याकडे लक्ष दिले पाहिजे. त्या महिलेचा बँक खाते क्रमांक लिहण्यात थोडीशी चूक झाली तरी संबंधित महिलेला या योजनेचा लाभ मिळणार नाही, हे लक्षात घ्या. त्यासाठी महिलांना फॉर्म भरण्यासाठी आपल्या कार्यकर्त्यांनी मदत करणे आवश्यक आहे. फॉर्म भरताना कोणतीही चूक होऊ नये, याकडे महायुतीच्या कार्यकर्त्यांनी लक्ष दिले पाहिजे.

महिलांबरोबरच सर्व वर्गातील मुलींना मोफत शिक्षण देण्याचा निर्णय आपल्या सरकारने घेतला आहे. ८ लाखापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील मुलींना मोफत उच्च शिक्षण दिले जाणार आहे. खाजगी महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींचे शुल्क राज्य सरकार भरणार आहे. एवढंच नव्हे तर १८ पेक्षा अधिक वय असणाऱ्या मुला-मुलींना उच्च शिक्षण मोफत देण्याचा निर्णयही आपल्या सरकारने घेतला आहे. महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय आपल्या सरकारने अगोदरच घेतला आहे. आता आपल्या सरकारने

## लाडकी बहीण योजनेला विरोध करणारे या योजनेचे फॉर्म घरोघरी वाटत आहेत

**विधानसभेत अर्थसंकल्प मांडला गेल्यावर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी लाडकी बहीण योजनेवर जोरदार टीका केली. या योजनेसाठी राज्य सरकार पैसा कोठून आणणार, असा प्रश्न उपस्थित करत या योजनेला माहविकास आघाडीने विरोध दर्शविला. एकीकडे सावत्र भावाप्रमाणे या योजनेला विरोध करणारी मंडळी या योजनेचे फॉर्म घरोघरी वाटत फिरत आहेत. आपणच ही योजना चालू केली आहे, अशा थाटात महाविकास आघाडीचे नेते या योजनेचे फलक लावत आहेत. एकीकडे विरोध करायचा आणि दुसरीकडे योजनेचे श्रेय घेण्याचे प्रयत्न करायचे, असा दुटप्पी खेळ महविकास ाआघाडीचे नेते खेळत आहेत.**

अन्नपूर्णा योजनेद्वारे महिलांना वर्षाला ३ गॅस सिलेंडर मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. वेगवेगळ्या निर्णयांद्वारे आपल्या सरकारने मातृशक्तीचा सन्मान केला आहे. महिला बचतगटांच्या अर्थसहाय्यसाठीही आपल्या सरकारने अनेक निर्णय घेतले आहेत. महायुतीतील महिला आघाडीच्या




पदाधिकाऱ्यांना, लोकप्रतिनिधींना माझं सांगणं आहे की त्यांनी महिला शक्तीच्या सशक्तीकरणासाठी आपल्या सरकारने घेतलेले निर्णय महिलांपर्यंत थेट पोहचवावेत.

महिलाबरोबरच अन्य समाज घटकांसाठीही आपल्या सरकारने चांगले निर्णय घेतले आहेत. **शेतकऱ्यांना फक्त एका रुपयात पीक विमा देण्याची योजना आपल्या सरकारने सुरू केली आहे. पीक विमा योजनेखाली देशात सर्वाधिक भरपाई महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मिळाली आहे.** शेतकरी सन्मान योजनेत केंद्राच्या ६ हजार रुपयाच्या अर्थसहाय्याबरोबर राज्य सरकारही ६ हजार रुपये देत आहे. राज्यातील शेतकऱ्यांना १२ हजार रुपये अर्थसहाय्य या योजनेनुसार मिळत आहेत. आता आपल्या सरकारने शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णयही अलिकडेच घेतला आहे. या योजनेची अंमलबजावणी कशी होणार, असे प्रश्न तुमच्या मनात आणि सर्वसामान्य शेतकऱ्यांच्याही मनात येणार आहेत. ज्या शेतकऱ्यांकडे वीज बिलाची थकबाकी आहे ती वसूल केली जाणार नाही. त्याचबरोबर या पुढील काळात शेतकऱ्यांना एक पैशाचेही वीज बील येणार नाही, अशा पद्धतीने या योजनेची अंमलबजावणी होणार आहे. काही लोकांना शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याची योजना फक्त निवडणुकीपुरतीच आहे का, अशी शंका वाटते आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारने निवडणुकीत मोफत वीज देण्याची घोषणा करून निवडणुकीनंतर ही योजना लगेच गुंडाळून टाकली आणि शेतकऱ्यांना मागील चार महिन्यांचे बील पाठवले. आपली योजना तशी नाही. आपली मोफत वीजेची योजना कायमस्वरूपी आहे, त्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरू केली आहे. या योजनेत शेतीचे फिडर सौर उर्जेत बदलण्यात येत आहेत. ९ हजार मेगावॅट फिडरचे काम सरकारने आधीच सुरू केले आहे. हे काम १८ महिन्यात पूर्ण करण्याचा आमच्या सरकारचा संकल्प आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर या ९ हजार मेगावॅट फिडरवर जे शेतकरी आहेत त्या सर्व शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज वर्षभर

## शेतकऱ्यांना मोफत वीज अशी मिळणार

**मागेल त्याला सौरपंप अशी योजना आपल्या सरकारने जाहीर केली आहे. शेतकऱ्यांना दिवसा किमान १० ते १२ तास वीजपुरवठा हवा आहे. शेतकऱ्यांना कमी दरात वीज देण्यासाठी सरकारवर मोठा आर्थिक बोजा पडतो. यासाठी सरकारने मागेल त्याला सौरपंप अशी योजना शेतकऱ्यांसाठी जाहीर केली आहे. या योजनेमुळे राज्य सरकारवरील आर्थिक बोजा कमी होणार आहे. सौरपंप बसवण्यासाठीचा ९० टक्के खर्च सरकार करणार आहे.**




मिळणार आहे. शेतकऱ्यांची दिवसा वीज पुरवठ्याची मागणी या योजनेमुळे पूर्ण होणार आहे. शेतकऱ्यांना कमी दरात वीज देण्यासाठी राज्य सरकार क्रॉस सबसिडी देते. शेतकऱ्याला १.२५ रुपयात एक युनिट वीज देण्यासाठी राज्य सरकारला ६ रुपये सबसिडी द्यावी लागते. सौर कृषी वाहिनी योजनेमुळे सरकारला ७ रुपयात घ्यावी लागणारी वीज सुमारे ३ रुपयात मिळणार आहे. याचा अर्थ सरकारची प्रत्येक युनिटमागे ४ रुपयांची बचत होणार आहे. आणखी ४ वर्षांनी सरकारला सध्या जेवढी सबसिडी द्यावी लागते त्यापेक्षा कमी सबसिडी देऊन मोफत वीज देणे शक्य होणार आहे. आमच्या सरकारने तयार केलेली योजना कामयस्वरूपी चालू राहील, अशा प्रकारची योजना आहे. उर्वरित ५ हजार मेगावॅट कृषी फिडर सौर उर्जेमध्ये बदलण्यासाठीच्या कामाच्या निविदा सरकारने काढल्या आहेत. याबरोबरच **आपल्या सरकारने शेतकऱ्यांसाठी मागेल त्याला सौर पंप अशी योजना तयार केली आहे. शेतकऱ्यांसाठी आपल्या सरकारने ९ लाख सौर पंप मंजूर केले आहेत.** या सौर पंपाच्या किमतीपैकी फक्त १० टक्के रक्कम शेतकऱ्यांकडून घेतली जाणार आहे. उरलेली ९० टक्के रक्कम केंद्र सरकार आणि राज्य सरकार देणार आहे. अनुसूचित जाती-जमातीच्या शेतकऱ्यांकडून सौर पंपाच्या किमतीपैकी फक्त ५ टक्के पैसे घेतले जाणार आहे. उरलेले ९५ टक्के पैसे केंद्र आणि राज्य सरकार देणार आहे. शेतकऱ्यांना हळूहळू या योजनेचे महत्व कळू लागले आहे.

## महायुती टिकवण्यासाठी तडतोड करावी लागणार आहे

**विधानसभा निवडणुकीत महायुतीला एकदिलाने सामोरे जायचे आहे. महायुतीतील घटक पक्षांच्या पदाधिकाऱ्यांना, नेत्यांना राजकीय महत्वाकांक्षा आहेत, हे मला ठाऊक आहे. मात्र निवडणुकीत प्रत्येकाची इच्छा, महत्वाकांक्षा महायुतीच्या नेतृत्वाकडून पूर्ण होणे शक्य नाही, हे वास्तव आपल्यापैकी प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे. विधानसभा निवडणुकीत एकजुटीने उतरण्यासाठी महायुतीतील घटक पक्षांच्या नेत्यांनी आपल्याला तडजोड करावी लागणार आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. महायुतीच्या समर्थक मतदारांचे कोणत्याही परिस्थितीत विभाजन होणार नाही, याची काळजी आपल्याला घ्यावी लागणार आहे.**

त्यामुळे शेतकऱ्यांकडून सौर पंपासाठीची मागणी वाढू लागली आहे. आधी वर्षाला ३ हजार सौर पंप बसविले जात होते. आता दिवसाला ५०० सौर पंप बसविले जात आहेत. आम्हाला हा वेग दिवसा ५ हजार सौर पंपापर्यंत वाढवायचा आहे. शेतकऱ्यांना मोफत आणि शाश्वत वीज पुरवठा करण्याची सोय या योजनेद्वारे उपलब्ध होणार आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी खऱ्या अर्थाने काम

करणार आपले सरकार आहे. दुधाचा पुरवठा वाढला की त्याचे भाव कमी होऊन शेतकऱ्यांना फटका बसतो. शेतकऱ्यांचे असे नुकसान टाळण्यासाठी आमचे सरकार दुध उत्पादक शेतकऱ्यांना ५ रुपये लीटरमागे अनुदान देणार आहे. त्याचबरोबर दुधाची भुकटी करण्यासाठी आणि त्या भुकटीची निर्यात करण्यासाठी आपल्या सरकारने ३० रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांना कोणत्याही स्थितीत प्रति लिटर ३५ रुपये भाव मिळावा, अशा पद्धतीने आपले सरकार काम करत आहे. गेल्या २ वर्षात आपल्या सरकारने शेतकऱ्यांना १५ हजार कोटी रुपये इतके अर्थसहाय्य केले आहे. हे अर्थसहाय्य शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा झाले आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये इतके अनुदान १५ लाख शेतकऱ्यांना गेल्या २ वर्षात देण्यात आले. आमचे सरकार केवळ घोषणा देणारे सरकार नसून ते निर्णय अंमलात आणणारे सरकार आहे. आपल्या सरकारने सिंचनाचे अनेक प्रकल्प मार्गी लावले आहेत. गेल्या २ वर्षात आपल्या सरकारने १२० पेक्षा अधिक सिंचन प्रकल्पांना मान्यता देऊन ८ लाख हेक्टरपेक्षा अधिक जमिन ओलिताखाली आणण्याचे नियोजन केले आहे. याबरोबरच अनेक नदीजोड प्रकल्प प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने आपल्या सरकारने निर्णय घेतले आहेत. जवळपास सव्वा लाख कोटी रुपये खर्चाचे नदीजोड प्रकल्प आपल्या सरकारने तयार केले आहेत. हे प्रकल्प जेव्हा पूर्ण होतील त्यादिवशी राज्य पूर्णत: दुष्काळ मुक्त होईल, याची खात्री आहे. वैनगंगा–नळगंगा, नार–पार यासारखे नदीजोड प्रकल्प विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागाला वरदान ठरणारे आहेत. त्याचबरोबर सातारा, सांगली, कोल्हापूर या भागातील पावसाचे अतिरिक्त पाणी पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील दुष्काळी भागाकडे वळवण्याची योजनाही आपल्या सरकारने आखली आहे. कृष्णा, कोयना, वारणा या नद्यांना अनेकदा पूर येतो आणि त्याचा फटका कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांना बसतो. हे पाणी कालव्याच्या माध्यमातून राज्याच्या अन्य भागात वळविले जाणार आहे.

आपल्या सरकारची लाडकी लेक योजनाही महत्वाची आहे. या योजनांचा प्रचार आणि प्रसार करणे ही महायुतीच्या कार्यकर्त्यांची जबाबदारी आहे. आपल्या सरकारने घेतलेले चांगले निर्णय ठासून सांगितले पाहिजेत. याबरोबरच **आशा सेविका, अंगणवाडी सेविका, पोलीस पाटील, ग्रामसेवक अशा सगळ्या घटकांचे मानधन वाढवण्याचा निर्णयही आपल्या सरकारने घेतला आहे.** समाजातील प्रत्येक घटकाला सहाय्य करण्याचा प्रयत्न आपल्या सरकारने केला आहे. आता वेळ आहे, हे सर्व चांगले निर्णय त्या–त्या समाज घटकांपर्यंत पोहचवण्याची. महायुतीतील सर्व घटक पक्षांनी हे निर्णय संबंधित घटकांपर्यंत नेण्यासाठी संवादक बनले पाहिजे. आपल्या सरकारची चांगली कामे जनतेपर्यंत नेली तर कोण काम करणारे आहे, कोण फक्त बोलबच्चनगिरी करणारे आहे, हे जनतेला कळेल. आपल्या कामांची माहिती जनतेपर्यंत गेली तर आपल्या आणखी काही करण्याची गरज नाही. आपण आता सर्वांनी आपल्या सरकारचा प्रवक्ता बनले पाहिजे. हिंदीमध्ये प्रवक्त्याला संवाददाता म्हणतात. त्याप्रमाणे आपण सर्वांनी सरकारच्या योजनांसाठी सामान्य माणसाबरोबर संवाद साधला पाहिजे. माझी महायुतीतील सर्व घटक पक्षांच्या नेत्यांना विनंती आहे की, एकमेकांबद्दलचे समज–गैरसमज जाहीरपणे व्यक्त करू नका. एकमेकांवर जाहीर टीका करू नका. यातून महायुतीतील विसंवाद जनतेपुढे येतो. महायुतीत एकी नाही असा प्रचार महाविकास आघाडीकडून होत आहे. या प्रचाराला आपण खतपाणी घालू नये. महायुतीतील जागावाटप वगैरे गोष्टी महायुतीतील ज्येष्ठ नेते ठरवतील. महायुतीतील प्रत्येक घटक पक्षाच्या नेत्यांना, पदाधिकाऱ्यांना आशा–आकांक्षा आहेत. मात्र प्रत्येकाची इच्छा पूर्ण होणे शक्य नाही. त्यासाठी आपल्यापैकी प्रत्येकाला तडतोड करावी लागणार आहे, हे लक्षात ठेवा. तडजोड केल्याखेरीज महायुती टिकणार नाही. प्रत्येकाने स्वत:बरोबर दुसऱ्याचाही विचार करणे आवश्यक आहे. कुणाला बोलण्याची खुमखुमी येत असेल तर नेत्यांची परवानगी घेऊन बोला. यापुढील काळात आपल्याला एकजुटीने, एकत्रितपणे वाटचाल करायची आहे. आपल्याला एकत्रितपणे बोलावे लागणार आहे, एकत्रितपणे काम करावे लागणार आहे. 'कदम मिलाकर चलना होगा', या अटलजींच्या कवितेप्रमाणे आपण एकजुटीने काम केले तर आपला विजय निश्चित आहे, याची खात्री बाळगा.

**जय हिंद, जय महाराष्ट्र**

# विधानपरिषद निवडणुकीत भाजपाचे सर्व उमेदवार विजयी



विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने सर्वच्या सर्व ५ जागा जिंकल्या. महायुतीने ११ पैकी ९ जागा जिंकून महाविकास आघाडीला दणका दिला. राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे, योगेश टिळेकर, डॉ.परिणय फुके, अमित गोरखे आणि सदाभाऊ खोत हे भाजपा उमेदवार विजयी झाले. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले.









# महिला हिताय, शेतकरी सुखाय

## मुलींना मोफत शिक्षण



● राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये, तंत्रनिकेतने, सार्वजिनक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रांमधील अभ्यासक्रमांमधील मुलींना या निर्णयाचा लाभ मिळेल. मात्र, खासगी अभिमत विद्यापीठे आणि स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांना तो लागू नसेल.

● आर्थिक क्षमता नसलेल्या पाल्यांना आता मुलींच्या शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करताना आर्थिक बोजा सहन करावा लागणार नाही.

**अनाथ मुलांनाही मोफत शिक्षण**

● अनाथ मुलींबरोबरच अनाथ मुलांनादेखील मोफत व्यावसायिक शिक्षण दिले जाईल.

● देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना अनाथांना सरकारी नोकऱ्यांमध्ये एक टक्का समांतर आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय झाला होता.

## लाडकी बहीण योजना



● सदर योजनेत अर्ज करण्याची मुदत दि.१ जुलै, २०२४ ते १५ जुलै, २०२४ पर्यंत ठेवण्यात आली होती. या मर्यादेत सुधारणा करण्यात येत असून आता सदर मुदत २ महिने ठेवण्यात येत असून ती दि. ३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत लाभार्थी महिलांना अर्ज करता येईल. तसेच दि. ३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत अर्ज करण्यात आलेल्या लाभार्थी महिलांना दि.०१ जुलै, २०२४ पासून महिन्याला रु.१५००/- आर्थिक लाभ देण्यात येणार आहे.

● या योजनेच्या पात्रतेमध्ये अधिवास प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले होते. आता लाभार्थी महिलेकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्या ऐवजी १५ वर्षापूर्वीचे १. रेशन कार्ड २. मतदार ओळखपत्र ३. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र ४. जन्म दाखला. या चारपैकी कोणतेही ओळखपत्र/प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहेत.

● सदर योजनेतून ५ एकर शेतीची अट वगळण्यात आली आहे.

● सदर योजनेत लाभार्थी महिलांचा वयोगट २१ ते ६० वर्ष वयोगट ऐवजी २१ ते ६५ वर्ष वयोगट करण्यात येत आहे.

● परराज्यात जन्म झालेल्या महिलांनी महाराष्ट्रातील अधिवास असणाऱ्या पुरुषाबरोबर विवाह केला असेल तर अशा बाबतीत त्यांच्या पतीचे १. जन्म दाखला २. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र ३. अधिवास प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

● रु.२.५ लक्ष उत्पन्न दाखला उपलब्ध नसेल तर ज्या कुटुंबाकडे पिवळे व केशरी रेशनकार्ड उपलब्ध असेल त्यांना उत्पन्नाच्या दाखला प्रमाणपत्रातून सुट देण्यात आली आहे.

● सदर योजनेत कुटुंबातील एका पात्र अविवाहित महिलेला सुध्दा या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

## लेक लाडकी योजना

● पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबात मुलीचा जन्म झाल्यावर ५ हजार रुपये.

● इयत्ता पहिलीत गेल्यावर ६ हजार रुपये.

● सहावीत गेल्यावर ७ हजार रुपये.

● ११ वीत गेल्यावर ८ हजार रुपये.

● १८ वर्षे पूर्ण झाल्यावर ७५ हजार रुपये.

● अशा रितीने एकूण त्या मुलीस १ लाख १ हजार रुपये एवढा लाभ मिळणार आहे.

● शासनामार्फत थेट लाभार्थी हस्तांतरण (DBT) द्वारे लाभाची रक्कम लाभार्थ्यांना अदा करण्यात येणार आहे.

● १ एप्रिल २०२३ नंतर कुटुंबात जन्मणाऱ्या १ अथवा

२ मुलींना त्याच प्रमाणे १ मुलगा व १ मुलगी असल्यास मुलीला या योजनेचा लाभ मिळेल.

● दुसऱ्या प्रसुतीच्यावेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास १ मुलगा किंवा दोन्ही मुलींना या योजनेचा लाभ मिळेल.

● पहिल्या अपत्याच्या तिसऱ्या हप्त्यासाठी व दुसऱ्या अपत्याच्या दुसऱ्या हप्त्यासाठी अर्ज सादर करताना माता, पित्याने कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

## अन्नपुर्णा योजना- ३ सिलेंडर मोफत



● वर्षाला घरटी तीन गॅस सिलेंडर मोफत देणार- ५२ लाख १६ हजार ४१२ लाभार्थी कुटुंबांना लाभ.

● लखपती दिदी- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ७ लाख नवीन गटांची स्थापना-बचत गटांच्या फिरत्या निधीच्या रकमेत १५ हजार रुपयांवरुन ३० हजार रुपये वाढ.

● महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना 'उमेद मार्ट' आणि 'ई-कॉमर्स ऑनलाईन प्लॅटफॉर्म' याद्वारे आतापर्यंत १५ लाख महिला 'लखपती दिदी', या वर्षात २५ लाख महिलांना लखपती करण्याचे उद्दीष्ट.

● रुग्णांची विशेषतः गरोदर माता व बालकांची आरोग्य संस्थेत मोफत ने-आण करण्यासाठी ३ हजार ३२४ रुग्णवाहिका.



● जल जीवन मिशन कार्यक्रमातून ग्रामीण भागातील १ कोटी २५ लाख ६६ हजार ९८६ घरांना नळजोडणी पूर्ण- राहिलेल्या २१ लाख ४ हजार ९३२ घरांसाठीचे काम प्रगतीपथावर.

● महिला लघुउद्योजकांसाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना'- अखिल भारतीय स्तरावरील महासंमेलनाचे राज्यात आयोजन.

● 'आई योजनेअंतर्गत' पर्यटन क्षेत्रातील महिला लघुउद्योजकांना १५ लाख रुपयापर्यंतच्या कर्जावरील व्याजाचा परतावा -१० हजार रोजगार निर्मिती.

● मुलींना मोफत उच्च शिक्षण- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय तसेच कृषि विषयक सर्व व्यावसायिक पदवी-पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित.

● ८ लाख रूपयापर्यंतच्या वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या इतर मागासवर्ग तसेच, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये १०० टक्के प्रतिपूर्ती.

● या निर्णयाचा अंदाजे २ लाख ५ हजार ४९९ मुलींना लाभ-सुमारे २ हजार कोटी रुपयांचा भार.

● नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीपोटी जुलै, २०२२ पासून १५ हजार २४५ कोटी ७६ लाख रूपयांची मदत.

● नोव्हेंबर-डिसेंबर, २०२३ मधील अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या २४ लाख ४७ हजार शेतकऱ्यांना २ हजार २५३ कोटी रुपयांची मदत.

● नुकसानीच्या क्षेत्राची मर्यादा दोनऐवजी तीन हेक्टर करुन राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषापेक्षा अधिक दराने मदत.

## शेतकऱ्यांसाठी विविध योजना



● खरीप हंगाम २०२३ करिता ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ तर १ हजार २१ महसूल मंडळांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करून विविध सवलती लागू.

● नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली संपूर्ण राज्यात लागू.

● 'नमो शेतकरी महासन्मान निधी योजने' अंतर्गत एकूण ९२ लाख ४३ हजार शेतकरी कुटुंबांना ५ हजार ३१८ कोटी ४७ लाख रुपये अनुदान.

● 'एक रुपयात पीक विमा योजने' अंतर्गत ५९ लाख ५७ हजार शेतकऱ्यांना ३ हजार ५०४ कोटी ६६ लाख रुपये रक्कम अदा.

● 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह

अनुदान योजने' अंतर्गत २ हजार ६९४ शेतकरी कुटुंबांना ५२ कोटी ८२ लाख रुपयांचे अनुदान वाटप.

● 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने' अंतर्गत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या १४ लाख ३३ हजार शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम म्हणून ५ हजार १९० कोटी रुपये अदा केले, उर्वरित रकमेचे वाटप त्वरीत.

● मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पातंर्गत १ हजार ५६१ कोटी ६४ लाख रुपये किमतीच्या ७६७ उपप्रकल्पांना मंजूरी- सुमारे ९ लाख शेतकऱ्यांना लाभ.

● विदर्भ आणि मराठवाड्यातील १४ विपत्तीग्रस्त जिल्हयातील केशरी शिधापत्रिकाधारक ११ लाख ८५ हजार शेतकरी लाभार्थीना मे २०२४ अखेर ११३ कोटी ३६ लाख रुपये थेट रोख रक्कम अदा.

● राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि राज्यपुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेतून गेल्या तीन वर्षात २ लाख १४ हजार शेती उपकरणांच्या खरेदीसाठी १ हजार २३९ कोटी रुपये अनुदान.

● 'गाव तेथे गोदाम' या नवीन योजनेत पहिल्या टप्प्यात १०० नवीन गोदामांचे बांधकाम तसेच अस्तित्वातील गोदामांची दुरुस्ती.

● कापूस, सोयाबीन तसेच अन्य तेलबियांच्या उत्पादकतेत वाढ आणि मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजना-सन २०२४-२५ मध्ये ३४१ कोटी रुपये निधी.

● आधारभूत किंमतीनुसार खरीप व रब्बी हंगामातील कडधान्य व तेलबियांच्या नाफेडमार्फत खरेदीसाठी १०० कोटी रुपयांचा फिरता निधी.

● खरीप पणन हंगाम २०२३-२४ मध्ये कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी ५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य.

## कांदा उत्पादकांना अनुदान



● कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सन २०२३-२४ मध्ये ३५० रुपये प्रति क्विंटलप्रमाणे ८५१ कोटी ६६ लाख रुपये अनुदान.

● कांदा आणि कापसाची हमीभावाने खरेदी करण्यासाठी प्रत्येकी २०० कोटी रुपयांचा फिरता निधी.

● खरीप पणन हंगाम २०२३-२४ मध्ये ६ लाख धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपयांप्रमाणे १ हजार ३५० कोटी रुपये प्रोत्साहन रक्कम प्रदान.

● नोंदणीकृत २ लाख ९३ हजार दूध उत्पादकांना प्रतिलिटर ५ रुपयांप्रमाणे २२३ कोटी ८३ लाख रुपये अनुदान वितरीत, राहिलेले अनुदानही त्वरित वितरीत करणार.

● दूध उत्पादक शेतकऱ्यांना आधार देण्याकरीता प्रतिलिटर पाच रुपयांप्रमाणे अनुदान देण्याची योजना जुलै, २०२४ पासून पुढे चालू ठेवण्यात येणार.

● पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, पशुचारा आणि पशुखाद्य उत्पादन या क्षेत्रात नव उद्योजक निर्माण करण्याकरीता नवीन 'दुग्ध व्यवसाय उद्योजकता प्रकल्प'.



● शेळी-मेंढीपालन आणि कुक्कुटपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी दोन नवीन प्रकल्प.

● मत्स्यबाजार स्थापना तसेच मासळी विक्री सुविधांसाठी ५० कोटी रुपये निधी.

● अटल बांबू समृद्धी योजनेतून १० हजार हेक्टर खाजगी क्षेत्रावर बांबूची लागवड -प्रतिरोपासाठी १७५ रुपये अनुदान.

● विविध अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे, वितरण प्रणालीतील सुधारणांसाठी नाबार्डकडून १५ हजार कोटी रुपयांचे दीर्घ मुदतीचे अर्थसहाय्य.

● म्हैसाळ जिल्हा सांगली येथे पथदर्शी सौर ऊर्जा प्रकल्प- अंदाजित किंमत एक हजार ५९४ कोटी रुपये- सांगली आणि सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ७५ हजार शेतकरी कुटुंबांना लाभ.

● स्वच्छ व हरित उर्जेचे ध्येय साध्य करण्यासाठी जनाई-शिरसाई, पुरंदर यासह सर्व शासकीय उपसा जलसिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण -४ हजार २०० कोटी रुपये खर्च.

● वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प- नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ.

● कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील पूरामुळे होणारी जीवित व वित्तहानी टाळावी आणि अतिरिक्त पाणी दुष्काळग्रस्त भागात वळविण्यासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने तीन हजार २०० कोटी रुपये किंमतीचा महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम.



● जलयुक्त शिवार अभियान- २ अंतर्गत मार्च २०२४ अखेर ४९ हजार ६५१ कामे पूर्ण-६५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद.

● 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेअंतर्गत एकूण ३३८ जलाशयातून ८३ लाख ३९ हजार ८१८ घनमीटर गाळ काढण्यात आला. ६ हजार शेतकऱ्यांना लाभ.

● **मागेल त्याला सौरउर्जा पंप-** शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करण्यासाठी सौर ऊर्जीकरण करण्याचा १५ हजार कोटी रुपयांचा प्रकल्प- एकूण ८ लाख ५० हजार शेतकऱ्यांना सौरउर्जा पंप उपलब्ध करून देण्यात येणार.

## तरुण-तरुणींना १० हजार रु.स्टायपेंड



● शासनाच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी दरवर्षी ५० हजार युवकांना कार्यप्रशिक्षण.

● **'मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना'- प्रति प्रशिक्षणार्थी दरमहा १० हजार रूपयांपर्यंत विद्यावेतन- दरवर्षी सुमारे ६ हजार कोटी रु.खर्च.**

● मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, यवतमाळ, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, कराड जिल्हा सातारा, अवसरी खुर्द जिल्हा पुणे, येथील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये 'सेंटर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्यास मान्यता.

● पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व नमो महारोजगार मेळाव्यातून सन २०२३-२४ मध्ये ९५ हजार ४७८ उमेदवारांची नोकरीसाठी निवड.

● 'स्वामी विवेकानंद आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास प्रबोधिनी' मुंबईत गोवंडी येथे कार्यान्वित- ग्रामीण भागात ५११ 'प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रे' स्थापन- १५ ते ४५ वयोगटातील १८ हजार ९८० उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षण.

● आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) इत्यादी संस्थांमार्फत एकूण २ लाख ५१ हजार ३९३ विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण- ५२ हजार ४०५ विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी प्राप्त.

● शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत स्वयंरोजगार अर्थसहाय्याच्या योजनांसाठी १०० कोटी रुपये निधीची तरतूद.

● अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांसाठीदेखील सन २०२४-२५ पासून विदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना लागू.

● इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेअंतर्गत दरवर्षी ३८ ते ६० हजार रुपयांपर्यंत निवासभत्ता.

● **गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार विकास महामंडळामार्फत ऊसतोड कामगारांच्या मुलामुलींसाठी ८२ शासकीय वसतीगृहे स्थापन करण्यास मंजूरी.**

● राज्यात सध्या असलेले १ लाख लोकसंख्येमागे ८४ डॉक्टरचे प्रमाण सन २०३५ पर्यंत हे प्रमाण १०० हून अधिक करण्यासाठी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेची नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि ४३० खाटांची संलग्न रुग्णालये स्थापन करण्यास मान्यता.

● मौजे सावर, तालुका म्हसळा, जिल्हा रायगड येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय युनानी महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता, बुलढाणा जिल्ह्यात नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय.

● शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ

निवासी डॉक्टर यांच्या विद्यावेतनात तसेच मानसेवी अध्यापकांच्या मानधनात भरीव वाढ.

● थ्रस्ट सेक्टरमधे अंदाजे १ लाख कोटी रुपयांची गुंतवणुक– ५० हजार रोजगार निर्मिती.

● हरित हायड्रोजन– २ लाख ११ हजार ४०० कोटी रुपयांची गुंतवणूक– ५५ हजार ९०० रोजगार निर्मिती.

● महापे, नवी मुंबई येथे २५ एकर जागेवर ‘इंडिया जेम्स ॲन्ड ज्वेलरी पार्क’ नियोजित– २ हजार सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांचा समावेश–५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक – एक लाख रोजगार निर्मिती.

● एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३ ते २०२८– पाच वर्षात २५ हजार कोटी रुपयांची भरीव गुंतवणूक– ५ लाख रोजगार निर्मिती.

● खासगी गुंतवणूक वाढविण्यासाठी लघु–वस्त्रोद्योग संकुले तसेच टेक्निकल टेक्सटाईल पार्क उभारण्यात येणार.

● सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्कुबा डायव्हींग केंद्र– २० कोटी रुपये खर्च अपेक्षित– ८०० स्थानिकांना रोजगार.



● संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतून निराधार, विधवा, दिव्यांग तसेच वृध्द नागरिकांच्या दरमहा अर्थसहाय्यात वाढ– एक हजारावरुन दीड हजार रुपये अशी वाढ– सन २०२३–२४ मध्ये ४५ लाख ६० हजार लाभार्थींना ७ हजार १४५ कोटी रुपये अनुदानाचे वाटप.

● ‘सर्व स्वरुपातील सार्वत्रिक दारिद्र्य नाहीसे करणे’ हे शाश्वत विकास ध्येय साध्य करण्याचा निश्चय.

● दिव्यांग व्यक्तींना इलेक्ट्रीक वाहनाचे वाटप करणार.



● **दिव्यांग व्यक्तींसाठी ‘धर्मवीर आनंद दिघे घरकुल योजना’**– पहिल्या टप्प्यात ३४ हजार ४०० घरकुल बांधणार.

● नव्याने निर्माण करण्यात आलेल्या तसेच कार्यरत महामंडळांसाठी निधीची पुरेशी तरतूद.

● पान, पानपिंपरी आणि मुसळीचे उत्पादन करणाऱ्या बारी समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी संत श्री रुपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळाची स्थापना.

● तृतीयपंथी धोरण–२०२४ जाहीर–भरती प्रक्रियेमध्ये तसेच सर्व शासकीय योजनांमध्ये स्त्री–पुरुषांसोबतच ‘तृतीयपंथी’ हा लिंग पर्याय उपलब्ध–तृतीयपंथीयांना राज्य शासनाच्या योजनांचा लाभ घेणे सुलभ.

● धनगर समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांसाठी खारघर, नवी मुंबई येथे ४ हजार चौरस मीटरचा भूखंड.

● महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण महामंडळामार्फत नोंदणीकृत घरेलू कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना.

● महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व कुटुंबांना लागू.

● आरोग्य विमा संरक्षणाची रक्कम प्रतिकुटुंब १ लाख ५० हजार रुपयांवरून ५ लाख रुपये– एक हजार ९०० रुग्णालयांमार्फत एक हजार ३५६ प्रकारचे उपचार उपलब्ध.



● **‘हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना’** ३४७ ठिकाणी कार्यान्वित.

● मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून राबवण्यात येणाऱ्या योजनांकरीता कर्जावरील शासन हमीची मर्यादा ३० कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपये.

● प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी, पारधी व आदिम आवास योजना, मोदी आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनांच्या माध्यमातून पुढील ५ वर्षात ३५ लाख ४० हजार ४९१ घरकुल बांधण्यात येणार.

● सन २०२४–२५ मध्ये विविध घरकुल योजनांकरीता ७ हजार ४२५ कोटी रु. तरतूद.

● बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील गिरणी कामगारांना १२ हजार ९५४ सदनिका वितरित–उर्वरित सदनिका उपलब्ध करुन देण्याचे नियोजन.

● पतसंस्थांच्या स्थिरीकरण व तरलतेसाठी १०० कोटी रुपये निधी.

● सन २०२४-२५ साठी स्वच्छ भारत अभियान ग्रामीणच्या दुसऱ्या टप्प्यासाठी १ हजार ८८६ कोटी ८४ लाख निधीची तरतूद.



● मुंबई, पुणे व नागपूर शहरांमध्ये एकूण ४४९ किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गिका उभारण्यास मान्यता. १२७ किलोमीटर लांबीच्या मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या. या वर्षात आणखी ३७ किलोमीटर लांबीच्या मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या करण्यात येणार.

● शिवडी-वरळी जोडरस्त्याचे काम डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण करण्यात येणार.

● ठाणे किनारी मार्ग- लांबी १३.४५ किलोमीटर - ३ हजार ३६४ कोटी रुपये किमतीचे काम मे २०२८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित.

● प्रधानमंत्री ग्रामसडक योजना- तिसऱ्या टप्पा- सुमारे ६ हजार ५०० किलोमीटर लांबीच्या रस्ते सुधारणांचे उद्दीष्ट- २ हजार ३०३ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे पूर्ण.

● मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात २३ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे ३ वर्षात पूर्ण करण्यात येणार.



● १९ महानगरपालिकांमध्ये पीएम ई-बस सेवा योजना राबविण्यात येणार.

● 'ड' वर्ग महानगरपालिका, सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये अग्निशमन सेवांचा विस्तार आणि आधुनिकीकरणासाठी ६१५ कोटी रुपयांची योजनाराबविण्यात येणार.

● भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजनेसाठी १ हजार ४०० कोटी रुपयांची तरतूद.

● संत सेवालाल महाराज जोडरस्ता योजना तसेच यशवंतराव होळकर जोडरस्ते योजनेची लवकरच अंमलबजावणी.

● धर्मादाय आयुक्तांच्या अधिपत्याखालील कार्यालयांच्या मुंबई, नंदूरबार, नांदेड, वर्धा, अमरावती आणि कोल्हापूर येथील इमारतींच्या बांधकामासाठी तसेच अस्तित्वातील इमारतींच्या नूतनीकरणासाठी १२५कोटी रुपयांचा निधी.

● मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेअंतर्गत २ हजार ५६७ ग्रामपंचायत कार्यालयांच्या बांधकामांना मान्यता.

● जागतिक वारसा नामांकनासाठी शिवकालीन १२ किल्ल्यांचा युनेस्कोकडे प्रस्ताव पाठविला, कोकणातील कातळशिल्पे, पंढरपूर वारी, दहीहंडी उत्सव आणि गणेशोत्सव याबाबतचे प्रस्तावही पाठविण्यात येणार.



**● रायगड किल्ल्यावर शिवराज्याभिषेक सोहळा दरवर्षी साजरा करणार.**

● वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदुर्ग येथे ६६ कोटी रुपये अंदाजित किंमतीचा आंतरराष्ट्रीय दर्जाचा पाणबुडी प्रकल्प.


● सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील पर्यटनस्थळांच्या विकासासाठी ३८१ कोटी ५६ लाख रुपये किमतीचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा मंजूर.

● कल्याण-नगर मार्गा माळशेज घाटात सर्व सोयींनीयुक्त अत्याधुनिक व्ह्युईंग गॅलरी उभारण्यात येणार.

● नागपूर जिल्ह्यातील रामटेक विकास आराखड्याच्या दुसऱ्या टप्प्यात २११ कोटी रुपये किमतीची कामे हाती घेण्यात येणार.

● अध्यात्मिक गुरु तथा समाजसुधारक महानत्यागी बाबा जुमदेवजी यांचे स्मारकासाठी पावडदौना, तालुका मौदा, जिल्हा नागपूर येथे विकास ७७ कोटीचा आराखडा तयार करणार.

● कोल्हापूर शहरातील राजाराम तलावाकाठी अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर उभारण्यात येणार.



● संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीची जिथे रचना केली त्या नेवासा येथील मंदिर परिसराचा विकास आराखडा तयार करणार.

● बी.जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथे बहुउद्देशिय सभागृह उभारण्याकरीता तसेच किसान शिक्षण प्रसारक मंडळ, बोरगाव-काळे तालुका जिल्हा लातूर या शैक्षणिक

संस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त आवश्यक निधी उपलब्ध करुन देणार.

- छत्रपती संभाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या शिराळा, जिल्हा सांगली येथे त्यांचे स्मारक उभारणार.
- संत श्री रुपलाल महाराजांचे समाधीस्थळ असलेल्या अंजनगाव सुर्जी, जिल्हा अमरावती येथे त्यांचे स्मारक उभारण्यात येणार.
- आदिवासी कलांचे प्रदर्शन, वृद्धी आणि कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी हतगड तालुका सुरगाणा जिल्हा नाशिक येथे कलादालन स्थापन करण्यात येईल.
- मुंबई येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या ३०५ कोटी रुपये किमतीच्या आराखड्यास मान्यता.
- जिल्हास्तरावर संस्थात्मक क्षमता वाढवून विकासाला चालना देण्यासाठी 'महास्ट्राईड' हा २ हजार २३२ कोटी रुपये किमतीचा प्रकल्प जागतिक बँकेच्या सहाय्याने राबविण्यात येणार.




- राज्यातील सर्व योजनांचे लाभ पात्र लाभार्थींपर्यंत थेट पोहोचावेत यासाठी योजनांचे मूल्यमापन करुन त्यांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करणार.



- **मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना–** राज्यातील ४४ लाख ६ हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णत: मोफत वीज पुरवली जाणार– १४ हजार ७६१ कोटी रुपये अनुदान देण्यात येणार.
- २०२४–२५ मध्ये जिल्हा वार्षिक योजना १८ हजार १६५ कोटी रुपयांचा नियतव्यय.
- वार्षिक योजना २०२४–२५ मध्ये कार्यक्रम खर्चासाठी एक लाख ९२ हजार कोटी रुपये.
- अनुसूचित जाती उपयोजनेकरीता १५ हजार ८९३ कोटी रुपये.
- सन २०२४–२५ मध्ये एकूण खर्चासाठी ६ लाख १२ हजार २९३ कोटी रुपयांची तरतूद.
- महसूली जमा ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी रुपये, महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी रुपये.
- महसूली तूट २० हजार ५१ कोटी रुपये, राजकोषीय तूट १ लाख १० हजार ३५५ कोटी रुपये.

## पेट्रोल व डिझेलचे दर कमी होणार



- पेट्रोल व डिझेलवरील मूल्यवर्धित कर राज्यभरात समान करण्याची तरतूद केली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक तसेच उद्योग व व्यापार क्षेत्राला दिलासा मिळणार आहे.
- या बदलामुळे ठाणे, बृहन्मुंबई आणि नवी मुंबई या महानगरपालिका क्षेत्रातील पेट्रोलचा दर अंदाजे पासष्ट पैसे व डिझेलचा दर अंदाजे दोन रुपये सात पैसे प्रति लिटर स्वस्त होणार आहे.

## वारकरी दिंड्यांना अनुदान



- पंढरपूरच्या वारीला जाणाऱ्या मुख्य पालख्यातील दिंडींना प्रति दिंडी २० हजार रुपये.
- 'निर्मल वारी' साठी ३६ कोटी ७१ लाख निधी.
- मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून देहू–आळंदी ते पंढरपूर या दोन्ही मुख्य पालखी मार्गावरील सर्व वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, मोफत औषधोपचार.
- पाच केंद्रीय सशस्त्र दलातील जवानांना व्यवसाय करातून सुट.



- केंद्रीय सशस्त्र पोलीस दलातील आसाम रायफल्स, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, भारत–तिबेट सीमा पोलीस दल, राष्ट्रीय सुरक्षा रक्षक व सशस्त्र सीमा दल यातील राष्ट्रीय कर्तव्य बजावणाऱ्या सशस्त्र जवानांना व्यवसाय कर भरण्यापासून सूट.
- तसेच मुद्रांक शुल्क परताव्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. ■

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना रशियाचा सर्वोच्च पुरस्कार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा रशियाच्या सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्काराने नुकताच सन्मान करण्यात आला. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी रशियातील भारतीयांशी साधलेला संवाद.

**९ जुलै** आहे आणि पदाची शपथ घेऊन आजच्या दिवशी मला एक महिना झाला. एक महिन्यापूर्वी ९ जूनला, भारताच्या पंतप्रधान पदाची मी तिसऱ्यांदा शपथ घेतली आणि त्याच दिवशी मी एक निश्चय केला होता. आपल्या तिसऱ्या कार्यकाळात तिप्पट जोमाने काम करण्याचा प्रण मी केला. तिप्पट वेगाने काम करेन आणि योगायोग असा आहे की सरकारने जी लक्ष्य ठेवली आहेत त्यापैकी अनेकांमध्ये तीन हा अंक आहे. तिसऱ्या कार्य काळात भारताला जगातली सर्वात मोठी तिसरी अर्थव्यवस्था करणे हे सरकारचे लक्ष्य आहे, तिसऱ्या कार्य काळात गरिबांसाठी तीन कोटी घरे उभारण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे, तिसऱ्या कार्य काळात तीन कोटी लखपती दीदी बनवण्याचे सरकारचे लक्ष्य आहे. कदाचित आपणासाठी हा शब्दही नवा असेल.

भारतात गावांमध्ये जे महिला स्वयं सहाय्यता गट आहेत, आम्ही त्यांचे सबलीकरण करू इच्छितो, त्यांचा कौशल्य विकास आम्हाला साधायचा आहे, वैविध्य आणण्याचे आहे. माझ्या तिसऱ्या कार्यकाळात गावातल्या गरीब महिलांपैकी तीन कोटी दीदी लखपती व्हाव्यात असा आमचा प्रयत्न आहे. म्हणजे त्यांचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा जास्त व्हावे, ते नेहमीसाठी व्हावे, फार मोठे लक्ष्य आहे. मात्र आपणासारख्या मित्रवर्गाचा आशीर्वाद असला की कितीही मोठी लक्ष्य अगदी सहजपणे साध्यही होतात. आजचा भारत जे लक्ष्य ठेवतो ते साध्य करतोच



हे आपण सर्व जाणताच. आज भारत असा देश आहे जो, चंद्राच्या ज्या भागावर जगातला कोणताही देश पोहोचला नाही तिथे चंद्रयान पोहोचवणारा आहे. आज भारत असा देश आहे जो जगाला डिजिटल व्यवहारांचे सर्वात विश्वासार्ह मॉडेल जगाला देत आहे. आज भारत असा देश आहे जो सामाजिक क्षेत्रातल्या सर्वोत्तम धोरणांमधून आपल्या नागरिकांचे सबलीकरण साधत आहे. आज भारत असा देश आहे जिथे जगातली तिसरी सर्वात मोठी स्टार्ट अप्स परीसंस्था आहे. २०१४ मध्ये जनतेने मला देशाची सेवा करण्याची पहिली संधी दिली तेव्हा स्टार्ट अप्सची संख्या शेकड्यांमध्ये होती आता ही संख्या लाखांमध्ये आहे. आजचा भारत असा देश आहे जो विक्रमी संख्येने पेटंटची

नोंदणी करत आहे, संशोधन प्रबंध प्रकाशित करत आहे आणि हेच माझ्या देशातल्या युवकांचे सामर्थ्य आहे, हीच त्यांची शक्ती आहे आणि हिंदुस्तान मधल्या युवकांचे कौशल्य पाहून जगही अचंबित आहे.

गेल्या १० वर्षात देशाने विकासाचा जो वेग घेतला आहे तो पाहून जगही आश्चर्यचकित झाले आहे. जगभरातले लोक भारतात येतात तेव्हा म्हणतात... भारतात बदल होत आहे. आपण येता तेव्हा आपल्यालाही असेच वाटते ना? त्यांना काय दिसून येते? ते पाहतात भारताचा काया पालट, भारताचे नव निर्माण, त्यांना हा बदल स्पष्ट दिसून येत आहे. जेव्हा भारत जी-२० सारखे यशस्वी आयोजन करतो तेव्हा संपूर्ण जग एकमुखाने म्हणते भारत कात टाकत आहे. जेव्हा भारत केवळ दहा वर्षात आपल्या विमानतळांची संख्या दुपटीने वाढवतो तेव्हा जग म्हणते भारत खरोखरच बदलत आहे. जेव्हा भारत केवळ दहा वर्षात ४० हजार किलोमीटरपेक्षा जास्त, हा आकडा लक्षात ठेवा, ४० हजार किलोमीटरपेक्षा जास्त रेल्वे मार्गाचे विद्युतीकरण करतो तेव्हा जगालाही भारताच्या सामर्थ्याची जाणीव होते. भारत बदलत आहे. आज भारत जेव्हा डिजिटल पेमेंटचे नवे विक्रम करत आहे, आज भारत जेव्हा एल-वन पॉइंटवरून सूर्य परिक्रमा पूर्ण करतो, आज भारत जेव्हा जगातला सर्वात उंच रेल्वे पूल बांधतो, आज भारत जेव्हा जगातला सर्वात उंच पुतळा उभारतो तेव्हा जग म्हणते भारत खरेच बदलला आहे आणि भारत कसा बदलत आहे? कसा बदलत आहे? भारत बदलत आहे कारण भारताचा आपल्या १४० कोटी नागरिकांच्या सामर्थ्यावर विश्वास आहे, अभिमान आहे. भारत बदलत आहे कारण १४० कोटी भारतीय विकसित भारताचा संकल्प साध्य करू इच्छितात. हिंदुस्तान परिश्रम घेत आहे, प्रत्येक शेतकरी, प्रत्येक युवक प्रत्येक गरीब मेहनत करत आहे. आज जगातल्या वेगवेगळ्या भागात माझे जे भारतीय बंधू-भगिनी राहतात, आपणा सर्व भारतीयांना, आपल्या मातृभूमीच्या कामगिरीचा अभिमान आहे. आपला भारत आज कोणकोणती शिखरे साध्य करत आहे हे आपण अभिमानाने मान उंचावून सांगत आहोत. आपल्या परदेशी मित्रांसमवेत भारताचा उल्लेख येताच आपण देशाची कामगिरी मांडतो आणि तेही ऐकताच राहतात.मी आपणाला विचारू इच्छितो, मी म्हणतो ते खरे आहे की नाही? आपण असे करता की नाही? आपल्याला आभिमान वाटतो की नाही? जगाचा आपणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आहे की नाही? १४० कोटी भारतीयांनी हे करून दाखवले आहे. आज १४० कोटी भारतीय, दशकांपासून सुरु असलेल्या समस्यांचे निराकरण करण्याचा विश्वास बाळगतात. समस्या तशाच दडपून जगत राहणे देशाला आता मान्य नाही, मित्रहो, आज १४० कोटी भारतीय प्रत्येक क्षेत्रात सर्वात पुढे जाण्याच्या तयारीत गुंतलेले असतात. तुम्ही देखील पाहिले आहे, आम्ही आमच्या अर्थव्यवस्थेला केवळ कोविड संकटातूनच बाहेर काढले नाही... तर भारताने आपल्या अर्थव्यवस्थेला जगातील सर्वात मजबूत अर्थव्यवस्थांपैकी एक बनवले आहे. आम्ही आपल्या पायाभूत सुविधांमधील कमतरता तर दूर करत आहोतच, पण आम्ही जागतिक मानकांचे मैलाचे दगड निर्माण करत आहोत. आम्ही केवळ आपल्या आरोग्य सेवांमध्येच सुधारणा करत आहोत असे नाही, तर देशातील प्रत्येक गरिबाला मोफत उपचारांच्या सुविधा देखील देत आहोत आणि आयुष्मान भारत ही जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा योजना चालवत आहोत. ही जगातील सर्वात मोठी योजना आहे. हे सर्व कसे होत आहे मित्रांनो? हे कोण करत आहे? मी पुन्हा एकदा सांगतो, १४० कोटी देशवासी. ते स्वप्नेही पाहतात, संकल्पही करतात आणि सिद्धीसाठी पूर्णपणे झोकून देऊन काम करत असतात. हे आमच्या नागरिकांचे कष्ट, एकाग्रता आणि निष्ठा यामुळे शक्य होत आहे.

भारतात हा बदल केवळ प्रणाली आणि पायाभूत सुविधांचाच नाही आहे. हा बदल देशातील प्रत्येक नागरिकाच्या, प्रत्येक तरुणाच्या आत्मविश्वासात देखील दिसत आहे. आणि तुम्हाला ठाऊक आहे यशाची जी पहिली पायरी असते ना ती स्वतःचा आत्मविश्वास असते. २०१४ च्या आधी आम्ही निराशेच्या गर्तेत बुडालो होतो. हताशपणा, निराशा यांनी आम्हाला जखडले होते. आज देश आत्मविश्वासाने भरलेला आहे. एकाच आजाराचे दोन रुग्ण रुग्णालयात असतील, तितकेच निष्णात डॉक्टर देखील असतील, मात्र, एक निराशेत बुडालेला रुग्ण आहे, दुसरा आत्मविश्वासाने भरलेला आहे तर तुम्ही पाहिले असेल की आत्मविश्वासाने भरलेला रुग्ण काही आठवड्यातच बरा होऊन रुग्णालयाच्या बाहेर येतो. निराशेत बुडालेल्या रुग्णाला कोणाला तरी दुसऱ्याने उचलून न्यावे लागते. आज देश आत्मविश्वासाने भरलेला

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळालेला रशियाचा सर्वोच्च सन्मान,'ऑर्डर ऑफ सेंट अँड्रयू दी पॉस्टल' हा कोणालाही सहज मिळणारा, सामान्य पुरस्कार नाही.
- १६९८ साली सुरू झालेल्या या पुरस्काराला तीनशेहून अधिक वर्षांची दैदीप्यमान परंपरा आहे. आजवर हा पुरस्कार ज्या उत्तुंग व्यक्तिमत्वांना देण्यात आला आहे, त्यांची नावं बघितली तर याची महती, अद्वितीय स्तर आणि दर्जा लक्षात येतो.
- फ्रेंच राज्यक्रांतीनंतर पसरलेली हिंसा आणि अराजक यांच्या गर्तेतून देशाला बाहेर काढणारा फ्रान्सचा जगज्जेता सम्राट नेपोलियन बोनापार्ट...
- जपानला विकसित, आधुनिक आणि शक्तिशाली राष्ट्र बनविणारा सम्राट मैजी...
- विविध प्रदेशांमध्ये विभागलेल्या जर्मन लोकांना एकत्र आणून जर्मन राष्ट्राची निर्मिती करणारा बिस्मार्क...
- आधुनिक रशियाची स्थापना करणारा पीटर द ग्रेट
- इतिहासाला वळण देणाऱ्या किंबहुना इतिहास घडविणाऱ्या महापुरुषांना हा सन्मान आजवर देण्यात आला आहे. या यादीत रशियाने आता मोदींना सन्मानाचं स्थान दिलं आहे.
- याप्रमाणे फ्रान्स, सौदी अरेबिया, युएई, अफगाणिस्तान पॅलेस्टाईन यासारख्या अनेक देशांनी मोदींना आपापल्या देशांचे सर्वोच्च सन्मान दिले आहेत.
- अमेरिका आणि रशिया, रशिया आणि युक्रेन, सौदी आणि इराण, इस्राइल आणि पॅलेस्टाईन... सगळ्यांशी एकाच वेळी उत्तम संबंध ठेवू शकणारं, अफ्रिकन युनियनला सन्मानाने जी२० मध्ये स्थान देणारं, 'ग्लोबल साऊथ'ची बांधणी करणारं, कोणत्याही दबावाला बळी न पडता देशहिताची धोरणं राबविणारं मोदी हे जागतिक पातळीवरील एकमेव नेतृत्व आहे.
- संपूर्ण जग अस्थिरतेच्या भोवऱ्यात सापडत असताना अशा सक्षम नेत्याच्या हाती देशाची सूत्रे आहेत हे आपले भाग्यच!

– अभिजीत जोग

आहे आणि हीच भारताची सर्वात मोठी पूंजी आहे.

आता मला पक्की खात्री आहे की तुम्ही देखील अलीकडेच टी-ट्वेंटी विश्वचषकात, हा विजय साजरा केला असेलच. केला होता की नाही? अभिमान वाटत होता की नव्हता? विश्वचषक जिंकण्याची खरी गाथा, विजयाच्या प्रवासाची देखील आहे. आजचा युवा आणि आजचा युवा भारत, अखेरचा चेंडू आणि अखेरच्या क्षणापर्यंत हार मानत नाही आणि विजय त्यांच्याच पायाचे चुंबन घेतो जे हार मानायला तयार नसतात. ही भावना केवळ क्रिकेटपुरती मर्यादित नाही आहे, तर दुसऱ्या खेळात देखील दिसत आहे. गेल्या काही वर्षात प्रत्येक आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आमच्या खेळाडूंनी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. यावेळी पॅरिस ऑलिंपिकमध्ये देखील भारताकडून एक शानदार संघ पाठवला जात आहे. तुम्ही बघा, संपूर्ण संघ, सर्व खेळाडू कसे आपली क्षमता दाखवतील. हीच युवाशक्ती भारताला २१व्या शतकाच्या नव्या उंचीवर पोहोचवण्याचे सामर्थ्य दाखवत आहे. तुम्ही निवडणुकीचे वातावरण देखील पाहिले असेल, टीव्ही वर पाहात असाल कसे चालले आहे?

२०१५ मध्ये जेव्हा मी इथे आलो होतो, तेव्हा मी म्हटले होते की २१वे शतक भारताचे असेल. तेव्हा मी म्हणत होतो, आज संपूर्ण जग म्हणत आहे. जगभरातील तज्ञांमध्ये आता या मुद्द्यावर कुठलेही दुमत नाही. सगळे म्हणतात २१वे शतक भारताचे शतक आहे. आज विश्व बंधू म्हणून भारत जगाला नवा विश्वास देत आहे. भारताच्या वाढत्या क्षमतांनी संपूर्ण जगाला स्थैर्य आणि समृद्धीचा आशेचा किरण दिला आहे. नवीन उदयोन्मुख बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेत भारताकडे एक मजबूत स्तंभ म्हणून पाहिले जात आहे. जेव्हा भारत शांतता, संवाद आणि मुत्सद्देगिरी बद्दल बोलतो, तेव्हा संपूर्ण जग ऐकते. जेव्हा जगावर संकट येते, तेव्हा भारत सर्वप्रथम पोहचणारा देश बनतो आणि भारत, जगाच्या अपेक्षा पूर्ण करण्यात कोणतीही कसर सोडणार नाही. दीर्घकाळ जगाने एक प्रभाव- आधारित जागतिक व्यवस्था पाहिली आहे. आज जगाला एकमेकांना सामावून घेण्याची गरज आहे. हा संदेश समागम, संगम यांना पूजणाऱ्या भारतापेक्षा कोण अधिक चांगले समजू शकतो? कोण देऊ शकतो? तुम्ही सर्वजण, रशियामध्ये भारताचे राजदूत आहात. जे इथे दूतावासात बसतात ना ते राजदूत आहेत आणि जे दूतावासाबाहेर आहेत ते राष्ट्रदूत आहेत. तुम्ही असेच रशिया आणि भारताचे संबंध मजबूत बनवत रहा. ■

# पंतप्रधान आवास योजनेची 9 वर्षे

## ३ कोटी अतिरिक्त घरांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी




भोजन आणि कपडे यांनतर जर सर्वाधिक गरजेची कोणती गोष्ट असेल, तर ते आहे घर. प्रत्येक व्यक्ती आपल्या 'एका घराचे स्वान उराशी बाळगून असते. दशकांपासून वंचितांचे हे अपूर्ण स्वप्न साकार करण्यात मदत करण्याकरिता केंद्र सरकारने २५ जून २०१५ रोजी प्रधानमंत्री आवास योजना-शहरी आणि २० नोव्हेंबर २०१६ रोजी पीएम आवास ग्रामीण सुरु केली. गेल्या १० वर्षात पीएमएवाय अंतर्गत पात्र ग्रामीण आणि शहरी लाभार्थ्यांसाठी ४ कोटी २१ घरे बांधून झाली आहेत. सर्वासाठी घरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आता तिसऱ्या कार्यकाळात मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत तीन कोटी अतिरिक्त ग्रामीण आणि शहरी घरे बांधण्यात मदत उपलब्ध करणाऱ्या प्रस्तावाला दिली आहे मंजुरी...

**पंतप्रधान** आवास योजना– शहरीच्या ९व्या वर्धापनदिनी हे सांगणे गरजेचे आहे की, प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ३ कोटी अतिरिक्त ग्रामीण आणि शहरी घरे कोट्यवधी भारतीयांच्या जीवनमानात सुगमता आणि सन्मानाला एक प्रोत्साहन आहे. यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने मागील कार्यकाळात योजनेला डिसेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ दिली होती. जेणेकरून स्वीकृत घरांचे बांधकाम पूर्ण होऊ शकेल आणि लाभार्थ्यांना चावी सोपवता येईल. आतापर्यंत ४ कोटींपेक्षा जास्त घरे बनली आहेत. त्यापैकी १ कोटींपेक्षा जास्त घरे शहरी गरिबांना देण्यात आली आहेत. आता ग्रामीण आणि शहरी अतिरिक्त घरांच्या निर्मितीचा निर्णय देशाच्या

घरांविषयीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी......

प्रत्येक नागरिकासाठी चांगल्या गुणवत्तेचे जीवन सुनिश्चित करणे आणि वंचितांना पक्के घर देण्याप्रति तिसऱ्या कार्यकाळात देखील केंद्र सरकारची वचनबद्धता दर्शवत आहे. पीएमएवाय अंतर्गत निर्मित सर्व घरांमध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या इतर योजनांना एकत्र करत घरगुती शौचालय, एलपीजी कनेक्शन, वीज कनेक्शन, सक्रीय घरगुती नळाचे कनेक्शन यासह पायाभूत सुविधा दिल्या जातात. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत सांगण्यात आले आहे की, पात्र कुटुंबांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे निर्माण झालेली घरांची गरज ही तीन कोटी अतिरिक्त घरे पूर्ण करतील. ज्यासाठी ग्रामीण आणि शहरी कुटुंबांना सरकार मदत देईल.

आवास योजना, गरिबांबरोबरच महिला सक्षमीकरणाला देखील खूप मोठ्या प्रमाणात ताकद देत आहे. गेल्या नऊ वर्षात देशात जी घरे लाभार्थ्यांना देण्यात आली आहेत, त्यापैकी जवळपास ७० टक्के घरे महिला लाभार्थ्यांच्या नावावर आहेत. यामध्ये बहुतेक महिला अशा आहेत, ज्यांच्या नावावर आयुष्यात पहिल्यांदाच एखाद्या मालमत्तेची नोंदणी झाली आहे. केंद्र सरकारच्या सर्वासाठी घरे योजनेतून घरे मिळवून लोकांमध्ये केवळ सन्मानाची भावनाच निर्माण झालेली नसून त्यांच्या आत्मविश्वासात देखील वाढ झाली आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेत पक्क्या घरांसाठी केंद्र सरकार सातत्याने आपल्या अर्थसंकल्पीय तरतुदीत वाढ करत आहे. चालू आर्थिक वर्षात गरजू पात्र लाभार्थ्यासाठी अधिकाधिक पक्की घरे बांधली जावीत, यासाठी २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात ८० हजार ६७१ कोटी रुपयांची व्यवस्था करण्यात आली आहे.ही घरे अशा कुटुंबांना मिळत आहेत ज्यांच्याकडे स्वतःचे पक्के घर नव्हते. आधुनिक तंत्रज्ञान असलेली लाईट हाऊस बनवले जात आहेत. ज्यामध्ये सुमारे १६ लाख घरे बांधली जात आहेत.

### पीएम आवास योजना-ग्रामीण'मध्ये मिळते ही मदत

प्रधानमंत्री आवास योजनेत केंद्र सरकार जी मदत देते, तिची प्रक्रिया आणि रक्कम निर्धारित आहे. पीएमएवाय-जी मध्ये मैदानी भागातील लाभार्थ्यांना १.२० लाख रुपये आणि ईशान्य आणि डोंगराळ राज्ये, कठीण भाग आणि एकीकृत कार्य योजना जिल्ह्यात १.३० लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (एमजीएनआरईजीएस) किंवा अर्थपुरवठ्याच्या इतर समर्पित स्रोताला एकत्र करुन शौचालयांच्या निर्मितीसाठी १२,०००/-रुपयांची अतिरिक्त मदत दिली जाते. पीएमएवाय-जी कुटुंबांना अन्य प्रासंगिक योजनांसोबत पाणी, एलपीजी आणि विजेची कनेक्ठान देखील दिले जातात.

> **कोट्यवधी भारतीयांच्या जीवनमानात सुगमता आणि सन्मानाला एक प्रोत्साहन! केंद्रीय मंत्रिमंडळाने प्रधानमंत्री आवास योजनेचा आणखी विस्तार करण्याचा आणि ३ कोटी अतिरिक्त ग्रामीण आणि शहरी घरे बनवण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय आपल्या देशाच्या घराविषयीच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी आणि प्रत्येक नागरिकासाठी एक जास्त चांगली गुणवत्ता असलेले जीवन सुनिश्चित करण्याप्रति सरकारची बांधिलकी अधोरेखित करत आहे. पीएमएवायचा वस्तार समावेशक विकास आणि सामाजिक कल्याणाप्रति आपल्या सरकारची वचनबद्धता देखील दर्शवत आहे.**
>
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

### योजनांच्या परिपूर्णतेचा प्रयत्न

जीवनातील मूलभूत गरजांसाठी देखील अनेक वर्षापासूनच्या जुन्या व्यवस्थेत लोक तळमळत राहिले. झोपडपट्टीमध्ये जन्म घेतला आणि पुढील पिढ्या देखील झोपडीतच राहतील, या निराशेतून देश बाहेर पडत आहे. विद्यमान सरकार गेल्या १० वर्षापासून योजनांच्या परिपूर्णतेसाठी जे प्रयत्न करत आहे, त्यामध्ये पीएम आवास योजनेचा मोठा पैलू आहे. धर्म-जाती, प्रांत यांच्या पलीकडे जात सर्व पात्र लाभार्थ्यांना घरे दिली जात आहेत. पंतप्रधान मोदी सांगतात की, जेव्हा गरिबाच्या आयुष्यातील मूळ गरजांची चिंता कमी होते, तेव्हा त्याचा आत्मविश्वास वाढतो.

### भाड्याच्या घरांसाठीदेखील व्यवस्था करत आहे सरकार

ज्यांच्याकडे आपले स्वतःचे घर नाही, त्यांना योग्य भाड्याने चांगले घर मिळेल याची काळजी देखील केंद्र



**वादळ-वारे वाहायचे तेव्हा खूप भीती वाटायची. लहान मुलांना घेऊन कुठे जायचे. छपरातून पाणी गळत असायचे. देवाकडे आशीर्वाद मागायचो कीआम्हाला घर मिळू दे. घरातून बाहेर जायचे असायचे, तेव्हा खूपच तणावाखाली असायचो. म्हणून आम्ही लोक खूप विचार करायचो की, घर मिळाले पाहिजे, घरात शौचालय असले, तर लहान मुलांना सुरक्षितता मिळेल. एकदा आमच्या घरात साप आला, त्यावेळी मग आम्ही मुलांना घेऊन बाहेर पळालो. घर मिळाल्यावर आम्हाला अतिशय आनंद झाला. घराचा हिरवा रंग खूपच आवडला. घर मिळाल्याने हाच फायदा झाला की, मुले चांगल्या प्रकारे राहात आहेत, चांगला अभ्यास करतील. घरात राहतील. मी विचार करायची, आपले घर सजवण्यासाठी, आता माझे घर मिळाले आहे, सर्व पुढे जात आहेत.**

**- उर्मिला देवी, भदोही, उत्तर प्रदेश**

सरकार घेत आहे. सरकारने शहरी प्रवासी, मजूर आणि इतर काम करणाऱ्यांना भाड्याची घरे मिळावीत यासाठी विशेष योजना तयार केली आहे. यासाठी अनेक शहरात विशेष संकुले देखील तयार केली जात आहेत.

किफायतशीर भाड्यासाठी निवासी संकुल (एआरएचसी) ची सुरुवात केंद्र सरकारने केली आहे. याच्या एका मॉडेल अंतर्गत तामिळनाडूमध्ये १८,११२ युनिट सह एकूण ४८, ११३ युनिटची निर्मिती केली जात आहे. या योजनेत प्रवाशांना त्यांच्या कामाच्या ठिकाणाच्या जवळ किफायतशीर दराने भाड्याची घरे उपलब्ध करून दिली जातील. योजनेच्या पहिल्या मॉडेलमध्ये चंडीगढ, गुजरात, राजस्थान, उत्तराखंड आणि जम्मू काश्मीरमध्ये सध्या असलेल्या सरकारी अर्थसहाय्याने बांधलेल्या ५६४८ घरांना शहरी गरिबांसाठी आणि प्रवाशांसाठी एआरएचसीमध्ये रुपांतरित करण्यात आले आहे. त्याबरोबरच ७ हजारांपेक्षा जास्त रिकामी घरांना देखील एआरएचसीमध्ये रुपांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण आणि प्रधानमंत्री आवास योजना-शहरी यांच्या मदुतीने पक्क्या घराचे मालक बनलेल्या कोट्यवधी कुटुंबांची कहाणी काहीशी अशीच आहे. कोणी झोपडी बांधून राहात होते, तर कोणाचा शहरी बकाल वस्तीमध्ये राहण्याचा नाईलाज होता, आता लोकांना आपले घर मिळाल्यावर आपला आत्मविश्वास, स्वाभिमान आणि वाढलेली प्रतिष्ठा यांच्या कहाण्या सांगताना ते थकत नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कित्येक वेळा ही गोष्ट सांगितली आहे की, आपले घर मिळण्याचा आनंद यासाठी देखील जास्त असतो कारण घर केवळ वीटा, सिमेंट यांनी तयार केलेली एक वास्तू नाही, तर यामध्ये आपल्या भावना, आपल्या आकांक्षा जोडलेल्या असतात, घराच्या चार भिंती आपल्याला सुरक्षा तर प्रदान करतातच, त्याबरोबरच आपल्यामध्ये एका चांगल्या भविष्याची हमी आणि विश्वास देखील निर्माण करतात. ■

# ‘असत्यचंद्राची’ फॅक्टरी

> लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात मुस्लिमांना देशातून बाहेर काढणार, दलित-आदिवासींचे आरक्षण रद्द करणार, संविधान बदलणार यासारख्या अनेक खोट्या-नाट्या गोष्टी पसरवून काँग्रेस आणि इंडिया आघाडीने सत्तेसाठी आपण कोणत्या थराला जावू शकतो, याची प्रचिती आणून दिली आहे. समाज माध्यमातून या खोट्या गोष्टींचा तुफानी प्रचार करून काँग्रेसने लोकसभेतील आपले संख्याबळ ९९ पर्यंत नेण्यात यश मिळवले.





**सामान्य** जनतेच्या मनावर सातत्याने खोटे बिंबवल्यामुळे सामान्य माणूसही संभ्रमात पडतो. खोट्या प्रचाराच्या तात्पुरत्या यशामुळे काँग्रेसचे युवराज राहुल गांधी यांचे धाडस आणखी वाढले आहे. अन्य कोणत्याही मुद्यांवरून भारतीय जनता पार्टी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा निवडणुकीच्या रणांगणात सामना करण्याची हिम्मत नसल्याने राहुल गांधींनी आता लोकसभेतही खोटे बोलण्याचे धाडस दाखवणे सुरू केले आहे. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेताना राहुल गांधी यांनी खोटे बोलण्याच्या सर्व मर्यादा पार केल्या. चर्चेदरम्यान राहुल गांधी यांनी अग्निवीर योजनेवर प्रश्न उपस्थित करत केंद्र सरकारच्या अग्निवीर योजनेत हुतात्मा दर्जा दिला जात नाही. याशिवाय हुतात्मा झालेल्या अग्निवीर जवानांच्या कुटुंबीयांनाही मदत दिली जात नाही असा आरोपही केला होता. यावेळी राहुल गांधी यांनी बुलढाण्यातील हुतात्मा अग्निवीर अक्षय गवते याचा उल्लेख केला होता. राहुल यांच्या वक्तव्यानंतर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी राहुल गांधी यांचा आरोप सपशेल खोटा असल्याचे लोकसभेतच सांगितले. तसेच राहुल गांधी यांच्या दाव्यानंतर हुतात्मा अग्निवीरचे वडील लक्ष्मण गवते यांनी त्यांना आतापर्यंत एकूण १ कोटी १० लाख रुपयांची मदत मिळाल्याचे सांगितले. त्यानंतरही राहुलबाबांनी आपला असत्याचा हेका चालूच ठेवला. ‘सत्य की रक्षा हर धर्म का आधार है!’ असे म्हणत राहुल गांधींनी अजय सिंह यांच्या कुटुंबियांना लष्कराकडून कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य मिळाले नसल्याचा दावा एक्स या समाज माध्यमावर केला होता. राहुल गांधींनी हा दावा केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी अजय सिंह याच्या वडिलांनी लष्कराकडून आपल्याला भरपाई मिळाल्याचे स्पष्ट केले. या मुद्यावरून राजकारण करू नका, अशी विनंती करणारा अजय सिंह याचे वडील चरणजीत काला यांचा व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारीत झाला आहे. हुतात्मा सैनिकाचे वडील आपल्याला अग्निवीर योजनेनुसार अर्थसहाय्य मिळाले असल्याचे सांगत असताना त्याचा प्रतिवाद करण्याचे धैर्य राहुल गांधी आणि त्यांच्या बगलबच्च्यांनी दाखवले नाही.




अग्निवीर योजनेनुसार अजय सिंह याच्या कुटुंबियांना ९८.३९ लाख रुपये देण्यात आलेले आहेत. अग्निवीर योजनेतील तरतुदीनुसार ६७ लाख रुपयांचे अर्थसहाय्य व अन्य फायदे काही प्रशासकीय बाबींची पूर्तता केल्यानंतर लवकरच दिले जातील, असे निवेदन भारतीय लष्कराकडून ३ जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात आले. लष्कराचे निवेदन आणि अजय सिंह याच्या वडिलांचा खुलासा पाहिल्यावर राहुल गांधी यांच्या 'झूठ का दुकान'मधून किती विखारी प्रचार सुरू आहे, याची कल्पना येऊ शकते.

एकीकडे 'सत्य की रक्षा हर धर्म का आधार है!' अशी एखाद्या महात्म्याला, तत्ववेत्याला शोभेल अशी भाषा करायची आणि दुसरीकडे 'गोबेल्स'ही लाजेल असे खोटे-नाटे सांगत फिरायचे, हे फक्त राहुल गांधींनाच जमू शकते. सत्तेत येण्यासाठी अधीर झालेल्या युवराजांना धादांत खोट्याचा आधार घेण्याशिवाय दुसरा रस्ता दिसू नये, हे गांधी-नेहरू घराण्याचे दुर्दैव म्हणायचे.

सलग १० वर्षे केंद्रातील सत्तेतून बाहेर राहिल्यामुळे राहुल गांधी आणि अनेक काँग्रेसजनांना आपल्या भवितव्याची चिंता लागून राहिली आहे. अनेक राज्यातून काँग्रेस हद्दपार झाली आहे. मोदी सरकारच्या गेल्या १० वर्षातील विकासकामांचा आणि कल्याणकारी योजनांचा आलेख आणि अनेक वर्षे देशाची सत्ता उपभोगलेल्या काँग्रेसचे प्रगती पुस्तक याच्यातील ठसठशीत फरक सामान्य भारतीय नागरिकाला जाणवू लागला आहे.


मोदी सरकारच्या कल्याणकारी योजनांचे अर्थसहाय्य एक पैसाही मध्यस्थांच्या आणि दलालांच्या खिशात न जाता लाभार्थ्यांना थेट बँक खात्यात मिळू लागले आहे. अशा सरकारला निवडणुकीच्या युद्धात समोरासमोर लढवून पराभूत करणे अशक्य आहे, हे कळून चुकलेल्या काँग्रेस नेतृत्वाने या निवडणुकीत खोट्या प्रचाराचा आश्रय घेतला. एआय तंत्रज्ञानाचा वापर करत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा खोटा व्हीडिओ प्रसारीत करून आरक्षण रद्द करण्यासाठीच भारतीय जनता पार्टीला ४०० जागा हव्या आहेत, असे मतदारांच्या मनावर बिंबवणे सुरू केले.

नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए) अंमलात आल्याने मुस्लिमांना देश सोडून जावे लागणार, अशा पद्धतीचा प्रचारही करून काँग्रेसने मुस्लिमांच्या मनात भीती निर्माण केली. अशा अनेक अफवा पसरवूनही काँग्रेसला लोकसभेत तीन आकडी जागा मिळवता आल्या नाहीत. राहुल गांधी यांच्या भगिनी प्रियांका गांधी याही खोटे-नाटे पसरवण्यात आपल्या बंधूपेक्षा सवाई ठरल्या आहेत. काही दिवसांपूर्वी दिल्ली विमानतळाच्या टर्मिनल-१ चे छत कोसळून एका कॅब चालकाचा मृत्यू झाला.

खरे तर या टर्मिनलचा अपघात झालेला भाग २००९ मध्ये मनमोहन सिंह सरकार सत्तेत असताना बांधला गेला होता. तरीही प्रियांका गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मार्च २०२४ मध्ये उद्घाटन झालेले छत कोसळले, असे ट्विट केले. एवढ्या मोठ्या प्रमाणात अपप्रचार करूनही मोदी सरकार तिसर्‍यांदा सत्तेत आल्यामुळे चवताळलेल्या काँग्रेस नेतृत्वाने सध्या 'असत्यचंद्राची फॅक्टरी'च सुरू केली आहे. आता त्यासाठी लोकसभेसारखे पवित्र व्यासपीठही वापरण्याचा निगरगट्टपणा राहुल गांधींनी दाखवला आहे. काळाच्या ओघात सामान्य भारतीय जनता या फॅक्टरीला नक्की टाळे ठोकेल, असा विश्वास आहे. ■

# काँग्रेसच्या संविधान निष्ठेची परीक्षा

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात काँग्रेस आणि सर्व भाजपा विरोधी पक्षांनी संविधान बदलाचा खोटा प्रचार जोमाने केला. आणिबाणीत संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गळा घोटणाऱ्या काँग्रेसने यानिमित्ताने संविधाना विषयीचे बेगडी प्रेम दाखवले. १९८५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने शाहबानो या घटस्फोटीत मुस्लिम महिलेला पोटगी देण्याचा आदेश तिच्या पतीला दिला होता. भारतीय संविधानाच्या सर्वांना समान न्याय या तत्वानुसारच सर्वोच्च न्यायालयाने हा निकाल दिला होता. त्यावेळी पंतप्रधान असलेल्या राजीव गांधी यांच्यावर मुस्लिम संघटनांनी आणलेल्या दबाबामुळे सरकारने सर्वोच्च न्यायालयाचा निकाल बदलण्यासाठी घटना दुरुस्ती केली. आता सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा घटस्फोटीत मुस्लिम महिलेला पतीकडे पोटगी मागण्याचा हक्क आहे, असा निकाल दिला आहे. ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने या निकालाविरोधात दाद मागण्याचे जाहीर केले आहे. काँग्रेस पक्ष आता काय भूमिका घेणार, याची प्रतिक्षा आहे.




शाहबानो या मुस्लिम महिलेने पोटगीसाठी अनेक वर्षे लढा दिला. आता सर्वोच्च न्यायालयाने शाहबानो खटल्याप्रमाणे निकाल दिला आहे.

**घटस्फोटित** मुस्लिम महिला फौजदारी प्रक्रिया संहिता (सीआरपीसी) च्या कलम १२५ अंतर्गत तिच्या माजी पतीविरुद्ध पोटगीचा दावा करू शकते, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच एका प्रकरणात दिला आहे. या निकालाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस, अखिलेश यादवांचा समाजवादी पक्ष, डावी आघाडी, ममता बॅनर्जींचा तृणमूल काँग्रेस अशा अनेक भाजपा विरोधी पक्षांच्या संविधानाविषयीच्या निष्ठेची कसोटी लागणार आहे. या निकालाला संदर्भ आहे तो १९८५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने शाहबानो खटल्यात दिलेल्या निकालाचा. इंदूरमधील प्रतिष्ठित वकील असलेले मोहमंद अहमद खान यांनी ४३ वर्षांच्या विवाहानंतर साठ वर्षांच्या आपल्या पत्नीला घटस्फोट दिला. पोटगीसाठी अर्ज करणाऱ्या शाहबानो यांना खालच्या कोर्टाने महिना वीस रूपये मंजूर केले. उच्च न्यायालयाने त्यात आणखी तब्बल १५९.२० रूपयांची वाढ केली. शाहबानो यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्यावर तत्कालीन सरन्यायाधीश यशवंतराव चंद्रचूड (विद्यमान सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांचे वडील) यांनी शाहबानोला आणखी दहा हजार वाढवून दिले. हा निकाल देणाऱ्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने या प्रकरणी शाहबानोच्या पतीची बाजू घेणाऱ्या ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डावर कडक टीका केली. सर्व धर्मियांना समुदायांना एकत्र आणू शकणारा कायदा करणे आव्हानात्मक असल्याची आम्हाला कल्पना आहे; मात्र कोठे तरी सुरूवात करायला हवी, हे सर्वोच्च न्यायालयाने हा निकाल देताना

१९८५ मध्येच नमूद केले होते. भारतीय संविधानानुसार बनवलेले वैयक्तिक कायदे मुस्लिमांना लागू होतच नाहीत अशी भूमिका घेत ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड, त्यावेळच्या जनता पक्षाचे नेते सैद शहाबुद्दीन यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाविरोधात गदारोळ चालू केला. १९८४ मध्ये राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे ४१५ अशा विक्रमी संख्येने लोकसभेत खासदार निवडून आले होते. सर्वोच्च न्यायालयाने संविधानानुसार दिलेला हा निकाल बदलण्यासाठी राजीव गांधी यांच्या सरकारवर मुल्ला मौलवींनी दबाव आणणे सुरु केले. तुमच्या मुलांना परदेशात नोकरी लावतो, पण पोटगीचा आग्रह सोडा असे आमिष शाहबानो यांना दाखवण्यात आले, रोख रक्कम देऊ केली गेली. शाहबानो यांच्या वरचा हा दबाव इतका वाढला की कोर्टात केस जिंकली नसती तर बरे झाले असते, असे आम्हाला वाटू लागले असे शाहबानोचा मुलगा जमील याने २०११ मध्ये हिंदुस्थान टाईम्स या ख्यातनाम वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत सांगितले. जमील यांची ही मुलाखत अजूनहि या वृत्तपत्राच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. मुल्ला मौलवींनी आणलेल्या दबावामुळे खुद्द पंतप्रधान राजीव गांधी यांनी शाहबानोच्या कुटुंबाला दिल्लीत भेटायला बोलावले. मुस्लीम महिलांना पोटगी देण्याची तरतूद कायद्यात नाही असे राजीव गांधींनी आम्हाला सांगितले. पोटगी देण्यासाठी कायदा दुरूस्त करून पोटगी देता येईल अशी सोय करा, असे जमील यांनी राजीव गांधी यांना सांगितले. मात्र तुम्ही पोटगीवरचा दावा सोडा, असा आग्रह राजीव गांधी यांनी धरला, असेही जमील यांनी या मुलाखतीत नमूद केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाविरुद्ध देशाच्या विविध भागांमध्ये मोर्चे निघू लागले. मुंबईत 'रास्ता रोको' आंदोलन झाले. इंदूरमधील शाहबानोच्या घरासमोरून प्रचंड मोर्चा काढला गेला. चहूबाजूनी होणाऱ्या गदारोळामुळे, दबावामुळे आमची आई म्हणजे शाहबानो हबकून गेली. आपली आई फार तर आणखी दोन-पाच-दहा वर्षे जगेल; तेवढ्यासाठी आपण कोर्टाला आणि सरकारला शरियाविरूद्ध जायला लावणारे कुटुंब हा डाग का लावून घ्यायचा, असा विचार आम्ही केला. आईने लग्नाच्यावेळी वडलांना तीन हजार चांदीची नाणी मेहर म्हणून दिली होती. मात्र वडलांनी त्याबद्दल्यात केवळ तीन हजार रूपये परत दिले. परिणामी राजीव गांधी यांना भेटून इंदूरला परत आल्यानंतर आपल्याला पोटगी नको असे आमच्या आईने जाहीर केले, असा इतिहास जमील यांनी या मुलाखतीत कथन केला आहे. या इतिहासाची राजीव गांधींचे चिरंजीव राहुल गांधी आणि त्यांची पाठराखण करणाऱ्या तमाम पत्रकार, विचारवंतांना आठवण करून देण्याची आवश्यकता आहे.

संविधानाच्या फौजदारी प्रक्रिया संहिता (सीआरपीसी) च्या कलम १२५ चे महत्व सर्वोच्च न्यायालयाने या निकालात नमूद केले आहे. ही बाब अशासाठी महत्वाची आहे की, शाहबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निकाल देताना म्हटले होते की, फौजदारी प्रक्रिया संहितेतील कलम १२५ ही धर्मनिरपेक्ष तरतूद आहे, जी मुस्लिम महिलांनाही लागू होते. मात्र राजीव गांधी यांच्या काँग्रेस सरकारने सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय मुस्लिम महिला (घटस्फोटावरील अधिकारांचे संरक्षण) कायदा १९८६ आणून रद्द केला. शहाबानो प्रकरणानंतर १९८६' मध्ये तयार करण्यात आलेला 'मुस्लीम महिला (घटस्फोटावरील अधिकारांचे संरक्षण) कायदा हा, सर्वसमावेशक आणि धर्मनिरपेक्ष फौजदारी संहिता कलम १२५ पेक्षा वरचढ असू शकत नाही, हा कायदा सर्वसमावेशक असून मुस्लीम महिलांनाही लागू होणारा आहे आणि पोटगी हे दानकर्म नसून घटस्फोटीत महिलांचा अधिकार आहे असा निवाडा १० जुलै २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिला आहे. राहुल गांधी, अखिलेश यादव व त्यांच्या इंडी आघाडीच्या खासदारांनी लोकसभेत प्रवेश करताना संविधानाची प्रत हातात घेत, संविधानाचा जयघोष करत आपण संविधानाशी किती एकनिष्ठ आहोत, हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला होता. आता या निकालाला विरोध झाला तर राहुल गांधींनी संविधानाशी इमान राखत सर्वोच्च न्यायालयाची पाठराखण करायला हवी. अर्थात यावेळी कितीही दबाव आला तरी सर्वोच्च न्यायालयाचा निकाल बदलला जाणार नाही. घटस्फोट झाल्यामुळे उदरनिर्वाहाची चिंता लागलेल्या शेकडो मुस्लीम महिलांना या निकालामुळे दिलासा मिळाला आहे. मुस्लीम धर्मातील जहाल पंथीय नाराज होतील म्हणून या निकालाच्या विरोधात राहुल गांधी, अखिलेश यादव आवाज उठवतात का याचीच प्रतीक्षा आहे. एका अर्थाने राहुल, अखिलेश, आणि संपूर्ण इंडी आघाडीच्या संविधान निष्ठेची परीक्षा या निमित्ताने लागणार आहे हे नक्की. ■

# अन्न महामंडळाने केली 266 लाख मेट्रिक टन गहू खरेदी



**भारतीय** अन्न महामंडळाने (एफसीआय) चालू रब्बी विपणन हंगाम (आरएमएस) २०२४-२५ मध्ये, गेल्या वर्षीच्या हंगामातील २६२ लाख मेट्रिक टन (एलएमटी) चा आकडा मागे टाकत, २६६ लाख मेट्रिक टन गव्हाची यशस्वीपणे खरेदी केली असून, देशाला अन्नधान्याच्या बाबतीत पुरेसे सुरक्षित केले आहे. आरएमएस २०२४-२५ दरम्यान २२ लाखांहून अधिक भारतीय शेतकऱ्यांना सरकारने केलेल्या गहू खरेदीचा लाभ मिळाला आहे. किमान आधारभूत किंमतीला (एमएसपी) झालेल्या गहू खरेदीमुळे या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात सुमारे ६१ लाख कोटी रुपये थेट जमा झाले आहेत. मोठ्या प्रमाणातील गहू खरेदीमुळे एफसीआय ला सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये अन्नधान्याचा स्थिर ओघ सुनिश्चित करण्यामध्ये मदत झाली आहे. पीएमजीकेएवाय सह विविध कल्याणकारी योजनांतर्गत अंदाजे १८४ एलएमटी गव्हाची वार्षिक गरज पूर्ण करण्यासाठी ही संपूर्ण खरेदी प्रक्रिया महत्वाची ठरली आहे. भारत सरकारने आरएमएस २०२४-२५ साठी गव्हाची किमान आधारभूत किंमत प्रति क्विंटल रु. २२७५ इतकी घोषित केली होती. गव्हाव्यतिरिक्त, खरीप विपणन हंगाम २०२३-२४ दरम्यान, केंद्रीय साठ्यासाठीची धान खरेदी ७७५ एलएमटी पेक्षा जास्त झाली. एक कोटीपेक्षा जास्त शेतकऱ्यांना याचा लाभ मिळाला असून, एमएसपी ने झालेल्या धान खरेदीद्वारे, या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १.७४ लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम थेट जमा झाली. यामध्ये देशभरातील मुख्यतः अल्प भू-धारक शेतकऱ्यांचा समावेश आहे. सध्याच्या या धान खरेदीमुळे केंद्रीय तांदूळ साठा ४९० एलएमटीच्या वर पोहोचला असून, यामध्ये अद्याप मळणी न झालेल्या १६० एलएमटी तांदळाचा समावेश आहे. ■

# संरक्षण उत्पादन 1.27 लाख कोटी रुपयांच्या विक्रमी उच्चांकावर



**आर्थिक** वर्ष २०२३-२४ मध्ये देशाच्या संरक्षण उत्पादनात आतापर्यंतच्या सर्वोच्च वाढीची नोंद झाली आहे. आत्मनिर्भरता साध्य करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारची धोरणे आणि उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी तसेच लक्ष्य साध्य करण्यावर दिलेला भर यामुळे संरक्षण मंत्रालयाने हे यश मिळवले आहे. देशातील संरक्षण उत्पादन १,२६,८८७ कोटी रूपयांच्या विक्रमी मूल्यावर पोहोचले आहे. मागील आर्थिक वर्षाच्या संरक्षण उत्पादनाच्या तुलनेत १६.७ टक्क्यापेक्षा अधिक अशी ही वाढ आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये संरक्षण उत्पादनाचे मूल्य १,०८,६८४ कोटी रुपये होते. सार्वजनिक क्षेत्रातल्या सर्व संरक्षण कंपन्या (डीपीएसयु), संरक्षण वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या इतर सार्वजनिक कंपन्या (पीएसयु) आणि खाजगी कंपन्यांकडून मिळालेल्या आकडेवारीत ही माहिती दिली आहे.

एक्स या समाजमाध्यमावर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या यशाबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली 'मेक इन इंडिया' कार्यक्रम वर्षानुवर्षे मैलाचे दगड पार करत आहे, असे त्यांनी सांगितले. भारताचा जागतिक संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून विकास करण्याच्या सरकारच्या अटल संकल्पाचा त्यांनी उल्लेख केला. २०२३-२४ मध्ये एकूण उत्पादन मूल्यापैकी डीपीएसयु /इतर पीएसयुचे सुमारे ७९.२% आणि खाजगी क्षेत्राचे २०.८% योगदान आहे. सार्वजनिक आणि खाजगी अशा दोनही क्षेत्रांनी संरक्षण उत्पादनात स्थिर वाढ नोंदवली आहे, असे या आकडेवारीवरून दिसते. त्याबद्दल राजनाथ सिंह यांनी दोनही क्षेत्रातल्या संरक्षण कंपन्यांचे अभिनंदन केले. आत्मनिर्भरतेवर भर देऊन सरकारने गेल्या १० वर्षात धोरणात्मक सुधारणा/उपक्रम आणि व्यवसाय सुलभता आणल्यामुळे हे यश प्राप्त झाले ■

## वारकऱ्यांसाठी पेन्शन योजना

■ वारकरी महामंडळाला ५० कोटींचे भागभांडवल.

■ वारकऱ्यांसाठी पवित्र असलेल्या सर्व तीर्थक्षेत्रांचा विकास

■ कीर्तनकार व वारकऱ्यांना वैद्यकीय मदत, विमा कवच

राज्यातील कीर्तनकार व वारकऱ्यांना सोयी व सुविधा पुरविण्यासाठी कल्याणकारी योजना राबविण्याकरिता मुख्यमंत्री वारकरी महामंडळ स्थापन करण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. या महामंडळाच्या माध्यमातून परंपरेने महिन्याची पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांना वृद्धापकाळात वारकरी पेन्शन योजना सुरू करण्यात येणार आहे.

■ राज्यात वारकरी मंडळ स्थापन करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी केली होती. १४ जुलै रोजी या योजनेचा आदेश जारी करण्यात आला. या महामंडळामार्फत वारकरी, कीर्तनकार यांच्यासाठी विविध योजना राबविण्यात येणार आहेत. तसेच विविध तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यात येणार आहे. या महामंडळाचे मुख्यालय पंढरपूर येथे असेल, महामंडळावर कार्यरत किवा सेवानिवृत्त भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात येईल.

■ राज्यातील वारकरी संप्रदायाच्या अडीअडचणी, प्रश्न सोडवणे.

■ सर्व पालखी सोहळ्यांच्या मार्गाची सुधारणा करणे, स्वच्छता, आरोग्य, निवारा व सुविधा यासाठी दरवर्षी आर्थिक तरतूद करून नियोजन.

■ आषाढी कार्तिकी वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांना सुरक्षा, विमा संरक्षण कवच देणे.

■ वारकरी भजनी मंडळाला भजन व कीर्तन साहित्याकरिता (टाळ, मृदंग, विणा, इ.) अनुदान.

■ कीर्तनकारांना आरोग्य विमा, मानधन सन्मान योजना.

■ आषाढी-कार्तिकी वारीसाठी दिंड्यांना दरवर्षी सानुग्रह अनुदान देणार.

■ पंढरपूर, देह, आळंदी, मुक्ताईनगर, सासवड, पिंपळनेर, त्र्यंबकेश्वर, पैठण, कोल्हापूर संस्थान, शेगाव, तारकेश्वर, भगवानगड, अगस्त्य ऋषी, संत सावतामाळी समाज मंदिर अरण (ता. माढा, जि. सोलापूर) व इतरही तीर्थक्षेत्रांचा विकास करणे.

# वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला राज्यपालांची मंजुरी



**विदर्भातील** ६ जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांनी तत्वतः मंजुरी दिली आहे. याबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांचे आभार मानले आहेत. सुमारे ८०,००० कोटींचा हा नदीजोड प्रकल्प आहे. या प्रकल्पाची मंजुरीची फाईल राज्यपाल रमेश बैस यांच्याकडे होती. त्याला तातडीने मंजुरी देण्यात यावी, अशी विनंती करण्यासाठी ९ जुलै रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेतली होती. त्यानंतर आज त्याला राज्यपालांनी तत्वतः मान्यता दिलेली आहे आणि तसे पत्र जलसंपदा विभागाला दिले आहे. सुमारे ८०,००० कोटींच्या या प्रकल्पातून विदर्भातील सिंचनाचे चित्र पालटणार आहे. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला आणि बुलढाणा आदी विदर्भातील ६ जिल्ह्यांना वरदान ठरणार आहे. या प्रकल्पामुळे ३स.७१ लाख हेक्टरवर क्षेत्र सिंचनाखाली येईल. पिण्याचे पाणी तसेच सिंचनाचे मोठे प्रश्न यातून सुटणार आहेत. या नदीजोड प्रकल्पाच्या कालव्याद्वारे सौर ऊर्जा निर्मिती होणार आहे. यात ४२६.५ किलोमीटर लांबीच्या कालव्यातून तलावात पाणी नेण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आमचे महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे.

# शहरी नक्षलवादा विरोधात कायदा होणार



**विधानसभेमध्ये** शहरी नक्षलवादाचे कंबरडे मोडणारा महाराष्ट्र जनसुरक्षा अधिनियम, २०२४ मांडण्यात आला आहे. नक्षलवाद हा आता केवळ वनवासी भागापुरताच राहिलेला नाही, तर तो कधीच तुमच्या आमच्या घरापर्यंत आला आहे. शेकडो फ्रंट संघटना वेगवेगळी फसवी नावे धारण करून नक्षलवादी कृत्ये करत असतात. कायद्यातील पळवाटांमुळे अशा संघटना, त्यांचे म्होरके आणि सदस्य अलगच सुटून जातात. मात्र, आता तसे होणार नाही; याची काळजी राज्य सरकारने घेतली असल्याचे दिसते. असाच कायदा आंध्र प्रदेशात अस्तित्वात असून त्यामुळे नक्षलवाद्यांच्या फ्रंट संघटना आणि अन्य फुटीरतावादी गटांवर अंकुश ठेवण्यासाठी झाला आहे.

### अशा आहेत तरतुदी

- एखादा व्यक्ती एखाद्या बंदी घातलेल्या संघटनेचा सदस्य नसेल, मात्र त्याचे त्या संघटनेत काही योगदान असेल; त्यास काही योगदान प्राप्त होत असेल; मदत करत असेल; मदत मिळवून देत असेल अथवा अशा गटांच्या बैठकांसाठी मदत कर असेल तर त्यास तुरुंगवासाची तरतूद करण्यात आली आहे.
- विधेयकातील तरतुदी राज्य सरकारला एखाद्या संस्थेस बेकायदेशीर म्हणून घोषित करण्याचे अधिकार देतात.
- विधेयकात सार्वजनिक सुव्यवस्था, शांतता आणि शांततेसाठी धोका किंवा धोका निर्माण करणारी बेकायदेशीर क्रियाकलाप अशी व्याख्या केली आहे. त्यामध्ये, सार्वजनिक शांतता धोक्यात आणणे; कायदेशीर संस्थांमध्ये हस्तक्षेप करणे; हिंसाचार, तोडफोड, बंदुकीचा वापर, स्फोटकांचा वापर करणे किंवा रेल्वे, रस्ता, हवा किंवा पाण्याद्वारे दळणवळणात अडथळा आणणे किंवा त्याचा प्रचार करणे; प्रस्थापित कायदा आणि त्याच्या संस्थांच्या अवज्ञेला प्रोत्साहन देणे किंवा प्रचार करणे; बेकायदेशीर क्रियाकलाप करण्यासाठी पैसे किंवा वस्तू गोळा करणे आदी कृत्यांचा समावेश आहे.
- या कायद्यांतर्गत सर्व गुन्हे दखलपात्र आणि अजामीनपात्र असतील आणि त्यांचा तपास सब-इन्स्पेक्टरच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या पोलीस अधिकाऱ्याकडून केला जाईल.

### अशी आहे शिक्षा

- जो कोणी बेकायदेशीर संघटनेचा सदस्य आहे किंवा अशा कोणत्याही संस्थेच्या बैठकांमध्ये किंवा क्रियाकलापांमध्ये भाग घेतो किंवा अशा कोणत्याही संस्थेच्या हेतूसाठी योगदान देतो किंवा प्राप्त करतो, त्याला तीन वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा दिली जाईल आणि ३ लाख रुपयांपर्यंत दंड देखील भरावा लागेल.
- जो कोणी, कोणत्याही प्रकारे बेकायदेशीर संस्थेचा सदस्य नसून, अशा संस्थेसाठी कोणतेही योगदान किंवा मदतीची मागणी करतो किंवा प्राप्त करतो किंवा अशा संस्थेच्या कोणत्याही सदस्याला आश्रय देतो, त्याला दोन वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तसेच २ लाख रुपयांपर्यंत दंड भरावा लागेल.
- जो कोणी बेकायदेशीर संस्थेचे व्यवस्थापन करतो किंवा सहाय्य करतो किंवा अशा कोणत्याही संस्थेच्या किंवा तिच्या कोणत्याही सदस्याच्या सभेला प्रोत्साहन देतो किंवा सहाय्य करतो किंवा कोणत्याही प्रकारे अशा संस्थेच्या कोणत्याही बेकायदेशीर कृतीत कोणत्याही प्रकारे किंवा कोणत्याही माध्यमाने किंवा साधनाद्वारे सहभागी होतो. तीन वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते आणि ३ लाख रुपयांपर्यंत दंडही होऊ शकतो.
- जो कोणी अशा बेकायदेशीर संघटनेची कोणतीही बेकायदेशीर कृती करतो किंवा करण्यास प्रोत्साहन देतो किंवा करण्याचा प्रयत्न करतो किंवा करण्याची योजना आखतो त्याला सात वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते आणि ५ लाख रुपयांपर्यंत दंड देखील होऊ शकतो.




**सातारा– बूथ रचना कार्य योजना– उपस्थिती–** खा.मेधा कुलकर्णी, पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे, सातारा जिल्हा प्रभारी सदाशिव खाडे, जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, आ.जयकुमार गोरे, सातारा शहराध्यक्ष विजय गोसावी, ज्येष्ठ नेते मदनदादा भोसले, मनोजदादा घोरपडे, प्रिया शिंदे, विक्रम बाबा पाटणकर, रामकृष्ण वेताळ, सातारा विधानसभा निवडणूक प्रमुख अविनाश कदम आदी.



**आजरा (जि.कोल्हापूर)– मंडल बैठक– उपस्थिती–** प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर, हिंदुराव शेळके, ज्येष्ठ नेते बाबा देसाई, मंडल अध्यक्ष अनिरुद्ध केसरकर, वी. दीपक सातोस्कर, सी. आर.देसाई, जयवंत सुतार, शैलेश मुळीक, विजय पाटील, अतिशकुमार देसाई, ज्योत्स्ना चराटी, वर्षा बागडी, माधवी पाचवडेकर, लहू वाकर, सुरेश पाटील, संदीप गुरव, संग्राम पाटील, संदीप पाटील आदी.



**पैठण (जि.संभाजीनगर)– तालुका कार्यकारिणी बैठक–उपस्थिती–** अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी, लक्ष्मण औटे, डॉ. सुनिल शिंदे, तुषार शिसोदे, सुरज लोळगे, दत्ता वाकडे, राम खनसे आदी.

पाक्षिक मनोगत प्रदेश बीजेपी




**माढा (जि. सोलापूर)– मंडल बैठकीचे आयोजन– उपस्थिती–** आ. सुभाष बापू देशमुख, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, जिल्हा सरचिटणीस शशिकांत चव्हाण आदी.





**भिवंडी– मतदार नोंदणी अभियान– उपस्थिती–** जिल्हाध्यक्ष ॲड. हर्षल पाटील, मतदार नोंदणी अभियान विभाग संयोजक संदीप लेले, भिवंडी पूर्व विधानसभा प्रमुख संतोष शेट्टी, सरचिटणीस विशाल पाठारे, ॲड. प्रवीण मिश्रा, राजू गाजेंगी, भरत भाटी, उपाध्यक्ष राजेश शेट्टी, युवा अध्यक्ष राजू चौगुले आदी.



**देगलूर– बूथ रचना कार्य योजना– उपस्थिती–** ज्येष्ठ नेते प्रविण साले, विधानसभा प्रमुख सुभाष साबणे, जिल्हा संयोजक डॉ. माधव पाटील–उच्चेकर, अनिल पाटील–खानापूरकर, प्रशांत दासरवार, अशोक साखरे आदी.

# एक पेड़ माँ के नाम



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्या मातोश्रींच्या नावाने एक झाड लावले.




नवी दिल्ली– उपस्थिती– राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा आदी.



नागपूर– पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक पेड़ मां के नाम' हे अभियान सुरू केले आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या नुकत्याच दिवंगत झालेल्या मातोश्रींच्या नावाने एक झाड लावले. यावेळी वन व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, आ. श्वेता महाले–पाटील, आ.भीमराव तापकीर, शरद बुट्टे–पाटील आदी उपस्थित होते.



सातारा– उपस्थिती– खा. मेधा कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, शहराध्यक्ष विकास गोसावी, प्रदेश कार्यकारणी सदस्य सुवर्णा पाटील, रीना भणगे, वैष्णवी कदम, वनिता पवार, अश्विनी हुबळीकर, राहुल शिवनामे, रवी आपटे, डॉ.सचिन भोसले आदी.



केंद्रीय नागरी उड्डाण व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आपल्या मातोश्रींच्या नावाने एक झाड लावले.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp













**प्रति,**

________________________

________________________

________________________

________________________

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com